प्रकरण २

# 'साखरफेरा' या मोहन पाटील यांच्या कादंबरीतील आशयसूत्र व इतर घटकांची चिकित्सा.

# प्रकारण २

'साखरफेरा' या 'मोहन पाटील' यांच्या कादंबरीतील

आशयसूत्र व इतर घटकांची चिकित्सा.

१) कथानक

२) भाषाशैली

३) व्यक्तिचित्रण –

किशा खोत

बायजा खोत

शामा

तुकामेंबर

जयसिंगअण्णा बातरे

भानुसिंग रजपूत

४) संवाद

५) शीर्षक

६) आशय

ग्रामीण साहित्याचा प्रवाह मराठी साहित्यातील एक प्रमुख साहित्यप्रवाह आहे. ग्रामीण साहित्यिक 'मोहन पाटील' हे शिरदवाड, ता. शिरोळ, जि. कोल्हापूरचे आहेत. नव्या पिढीतील दमदार कादंबरीकार म्हणून त्यांची ख्याती आहे. 'साखरफेरा' ही 'मोहन पाटील' यांची अगदी अलिकडची २००६ साली प्रसिद्ध झालेली कादंबरी आहे. ही कादंबरी म्हणजे शेतकरी जीवनातील ऊस प्रश्नांच्या व्यथा कथांचा आरसाच आहे. या कादंबरीमुळे ऊस उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्या, सहकारातील भ्रष्टाचार, ऊस या पिकाशी संबंधित घटनांचे विवेचन केले आहे.

या प्रकरणामध्ये आपल्याला 'साखरफेरा' या कादंबरीचा चिकित्सक अभ्यास करावयाचा असल्याने. कादंबरीतील कथानक, व्यक्तिचित्रण, भाषाशैली, संवाद, निसर्गवर्णन, परिसर इ. घटक जे साहित्यकृती – साखरफेरा ह्या कादंबरीच्या अध्ययनार्थ आपण पाहणार आहोत.

**कथानक –**

'मोहन पाटील' यांच्या 'साखरफेरा' या कादंबरीची पहिली आवृत्ती अनिरूद्ध अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर, पुणे यांनी २००६ साली पहिली आवृत्ती प्रकाशित केली.

कादंबरीचे कथानक दोन विभागामध्ये विभागले आहे. पहिल्या विभागात किशा या शेतकऱ्याचा पेटलेला ऊस व त्यामुळे त्याच्यापूढे निर्माण होणाऱ्या समस्या. बोरीगावमधील शेतकरी लोकांचे जीवन, त्यांचे प्रश्न, समस्या, दारिद्र्य, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ऊस लागवडीपासून ऊसाचे उत्पादन काढून तो कारखान्याला पाठविण्यासाठी करावी लागणारी धडपड इ. गोष्टींचे स्पष्टपणे चित्रण केलेले दिसते.

दुसऱ्या विभागामध्ये महात्मा सहकारी साखर कारखान्याच्या बॉयलर प्रदीपन व नंतर शेतकरी संघटनांनी ऊसाला भाव मिळावा म्हणून कारखाना चालू होताच निर्माण केलेले मोर्चे आंदोलन व शेवटी शेतकऱ्यांचा विजय इत्यादी अनेक गोष्टी प्रभावीपणे मांडल्या आहेत.

'साखरफेरा' या कादंबरीमध्ये 'किशा खोत' हा छोटा शेतकरी आहे. तसेच कादंबरीतील ही मुख्य व्यक्तिरेखा, गांवदरीत किशाचा एक एकर ऊसाचा फड होता. तो भर उन्हात पेटला की

कोणी पेटवून दिला हे काही कळले नाही त्यामुळे किशा दुःखी झाला. बायको बायजा नशिबाला दोष देऊ लागली. कष्ट करून जोमाने आणलेल्या फडाची राख झालेली. पन्नास टन ऊस आगीने गिळून टाकला. पंचवीस हजाराचा तोटा झाला. हंगामाचे पीक तोंडचा घास ओढून घ्यावा तसे नियतीने ऊसाच्या फडाचे केले. त्यामुळे किशाचे मन करपून गेले. शामा, नामा, गुंडा, जयसिंगअण्णा यांनी किशाला शांत करून त्याचे सांत्वन केले. प्रत्येकाने आपआपल्या पद्धतीने मदत करायचे ठरविले. त्यामुळे किशाला थोडे बरे वाटले.

किशाला जळक्या ऊसाचे बिल मिळाले. तेवढ्याने काही कात चुनाही भागणार नव्हता. म्हणून त्याने गोठ्यातली जनावरे विकून अधिक जळक्या ऊसाचे बिल असे करून, कर्ज भागवून टाकले. त्यावेळी त्याला खूप वाईट वाटते पण या गोष्टीला पर्याय नव्हता. कर्ज भागविले नाही तर व्याजाचा आकडा वाढतच जाणार होता.

जयसिंगअण्णा हे बोरीगाव सहकारी सोसायटीचे चेअरमन होते. सोसायटीतील सर्व कारभार अंदाधुंदीचा भ्रष्टाचारी चाललेला होता. सोसायटीची दुकाने बंद पडली होती. परंतु अण्णा प्रामाणिक होते. इतर दुकाने बंद पडली असली तरी पाणी सोसायटी सुरळीत चालली होती. या सर्वापाठीमागे अण्णांना बदनाम करण्यासाठी दुसऱ्या पक्षाचा हात होता. अण्णा गरीब लोकांशी प्रेमाने वागत त्यांची कामे करत. पुढचा माणूस बघूनच त्याच्या कामातून पैसे काढत. त्यामुळे तुका मेंबरांना अण्णांसारखे लोक सहकारात घालून सहकाराचा कारभार सुरळीत चालवायचा होता.

किशा हा गरीब होता त्यामुळे त्याला आपल्या भावाच्या विषयी द्वेष वाटे. कारण दोघांनाही सारखीच जमीन असून गजा हा किशापेक्षा खूप श्रीमंत होता. गजा सारखे आपणही श्रीमंत व्हावे यासाठी तो ऊस लावण करायला धडपडत असे परंतु भांडवलाअभावी ते शक्य नव्हते. कारण ऊसाशिवाय दुसऱ्या कोणत्याच पिकातून एकरकमी हुकमी पैसे मिळत नाहीत.

तुका मेंबरनी किशाचं अवघड दुखणं सोडवले. कारखान्याच्या ऊस विकास योजनेची माहिती किशाला सांगितली. तसेच या योजनेचा शुभारंभही किशाच्याच हस्ते केला. किशाला समारंभ पूर्वक चेक दिला जातो. त्याचा फोटो पेपरमध्ये येतो गावोगावी त्याचे नाव होते.

गावातील पुढाऱ्यांनी व किशाच्या मित्रांनी किशाकडून पार्टी घेतली. दारू मटणाचा बेत आखला. आधीच पैसे नाहीत म्हणून गांजलेल्या किशाच्या पैशाला पुन्हा एकदा वाट. मनात नसूनही सर्वांपुढे त्याला काही बोलता येत नाही. साग्रसंगीत पार्टी पार पडते.

पैसे मिळाल्यामुळे किशा खूप सुखावला होता. लागण लवकरात लवकर उरकण्यासाठी तो धडपडत होता. कारण नंतर ऊस दराविषयी आंदोलन चालू होणार होते. ऊस लागण संपवून किशा मनात आपली स्वप्ने रंगवू लागला. त्याच्या मनात उत्साह निर्माण झाला. त्याच्या मित्रांनाही लावणीसाठी अनेक अडचणी होत्या. त्यांनीही त्या दूर करून लावणी उरकल्या. ऊस लावण करून सर्वजण रिकामे झाले. परंतु या सर्वाच्या दरम्यान ऊस जळल्यामुळे मन विचलित झालेल्या किशाला मध्येच पांढऱ्या उंदरांची स्वप्ने पडत होती. स्वप्नात माळावरची जत्रा, सजवलेले गाढव दिसत होते अशी विचित्र स्वप्ने त्याला पडत होती.

विभाग दोन मध्ये साखर कारखान्यांचा बॉयलर साधेपणानं पेटवला गेला. कार्यक्रमासाठी कोणीच हजर राहणार नव्हते. कारण कारखाना ऊसाला योग्य दर देत नव्हता. त्यामुळे सर्वांना राग होता. तर नोकरदारांचे पगार न झाल्याने ती मंडळी दुःखी होती. शेतकरी ऊसाला योग्य दर मिळण्यासाठी आंदोलनाची तयारी जोमाने करत होते. गळीत हंगामाच्या ऐन मोक्यात कारखान्यास वेठीस धरून संघटनेची हालचाल चालू होती काहीही झाले तरी ऊसाला टनाला बाराशे दर मिळाल्याशिवाय ऊस कारखान्याला पाठवायचा नाही. कारण या पुढाऱ्यांनी सर्व संस्थामध्ये भ्रष्टाचार करून त्या मोडकळीस आणल्या. त्यामुळे कारखान्यांची अवस्था बिकट झाली आहे. झोंबडे पाटलांसारख्या चेअरमन व पुढाऱ्यांनी कारखाना भ्रष्टाचार करून डबघाईला आणला. मनमानी कारभार केला. कारखान्याचा खाजगी मालमत्ते प्रमाणे वापर केला. त्यामुळे कारखान्याचा तोटा होऊन कारखान्याला ऊसाला योग्य दर देणे परवडेना. हे असे किती दिवस चालणार म्हणून भानुसिंगने कारखान्याविरूद्ध शेतकरी संघटना उभी केली. संघटनेची काम एकदम सुरळीतपणे चालविले होते. गांधीजींच्या अहिंसा तत्वाचा स्वीकार केला होता. तरीही सभा खंदारेचे लोक हात घाईवरती उतरतात दोन्ही पक्षात मारामारी होते. त्यात भानुसिंगच्या डोक्यावर जोरात काठी बसून रक्ताची चिळकांडी उडते तो जखमी होतो. त्यामुळे सर्वत्र

वातावरण अधिक संतप्त होते. शेतकरी खवळतात. शेतकऱ्यांच्या हितासाठी अहोरात्र धडपडणाऱ्या नेत्यावरती असा प्राणघातक हल्ला झाला याच्या बातम्या महाराष्ट्रभर पसरतात. सरकारच्या खुर्च्या हालू लागतात. त्यामुळे सरकारकडून शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले जाते. सर्वत्र आनंदी-आनंद होतो. भानुसिंगमुळे शेतकऱ्यांना न्याय मिळाला त्यामुळे भानुसिंग शेतकऱ्यांचा आवडता नेता होतो.

आंदोलनाचे वातावरण शांत झाल्यावर किशा ऊस लावण कशी उगवली आहे हे बघण्यासाठी गेला. किशाची लावण चांगली उगवली होती. एवढ्यात शेजारच्या रानातील शेतकऱ्याने हाक मारली तेव्हा त्याने सांगितले ऊसावरती मावा आला आहे. हे पाहुन किशा हतबल झाला. कारण आज ना उद्या किशाच्या लागणीवरतीही तो येणार होता. किशाला खूप वाईट वाटू लागले कारण प्रत्येकवेळी ऊसाने त्याला फसवले होते. पाण्यामुळे रान गारठलं, दुसऱ्या वेळीस जळला तर आता मावा रोगाने लावणीचे मात्र होणार या विचाराने किशाच्या हातापायातून बळ गेल्यासारखे झाले. कसातरी सावरत घरी आला. जेवला आणी झोपला. तर त्याला स्वप्नात पुन्हा पांढरे उंदीर दिसू लागली. ही पांढरे उंदीर किशाचे घोंगडे कुरतडत होती. जणू काही किशाचं नशिबच कुरतडून त्याच्या नशिबाला जागोजागी बिळे पाडत होती. आणि हे खड्डे भरता-भरता गरीब शेतकरी डोके वर काढू शकत नव्हता. तो अधिक कर्जबाजारी होतो. या सर्व घटनांचे वास्तव चित्रण 'साखरफेरा' मध्ये मोहन पाटील यांनी केले आहे.

कादंबरीच्या कथानकाची सुरूवात ऊस जळल्यामुळे अगतिक दुःखी झालेल्या शेतकऱ्याच्या शोकांतिकेपासून होते. तर शेवट किशाला पडलेल्या पांढऱ्या उंदरांच्या विचित्र स्वप्नाने होतो. पांढऱ्या साखरेने भरलेल्या पेवातून बाहेर आल्यामुळे ही उंदीर पांढरे होते का? असाही प्रश्न पडतो किंवा पांढरे उंदीर साखरेचे प्रतिक म्हणून आलेली आहेत का? तसेच किशाच्या कोवळ्या ऊसावरती मावा येऊ लागल्यामुळे दुःखी झालेल्या शेतकऱ्याच्या मनस्थितीतूनही कादंबरीचा शेवट होताना दिसतो. तर मध्ये संपूर्ण कथानक सहकारातील भ्रष्ट कारभारामध्ये बरबटलेल्या अधिकाऱ्यांची कार्य, भ्रष्टाचार, ऊस दर प्रश्न, आंदोलन शेवटी ऊसाला योग्य दर अशा विविध प्रसंगाना वळण देत गतिमान होताना दिसते. छोट्या-मोठ्या संवादातून

पात्रे उठावदार दिसतात. पात्रांच्या तोंडी असणारी ग्रामीण बोली भाषा कादंबरीला ग्रामीणत्वाचा साज चढवत वर्तमानातील वास्तव घटनांचे समर्पक व मार्मिक शद्वात चित्रण करून कादंबरीला अलौकिकत्व प्राप्त करते.

**व्यक्तिचित्रण :-**

कादंबरी म्हटल की कादंबरीत विविध गुणांच्या व्यक्तिंचे जाळे असते. अनेक व्यक्ती कादंबरीमध्ये वावरत असतात. कादंबरीच्या रचनेनध्ये अचूक, मुख्य आणि गौण व्यक्तिची निवड केली तरच कादंबरीला नेमकेपणा प्राप्त होतो. साधारणपणे मुख्य पात्रांमध्ये नायक, नायिका, खलनायक यांचा समावेश होतो. तर कथानक पूढे. सरकविण्यासाठी गौण पात्रांचा समावेश होतो. सशक्त व्यक्तिचित्रणावरच त्या कादंबरीचे यश अवलंबून असते. 'साखरफेरा' मधील सर्व पात्रे वास्तवाशी जवळीक साधताना दिसतात. त्यातील काही पात्रे मुख्य असतात तर काही गौण यांचे विस्तारीतपणे विवेचन पुढीलप्रमाणे केले आहे.

'साखरफेरा' या कादंबरीमध्ये किशा, बायजा ही पती-पत्नी, गजा खोत, जयसिंग बातरे, हणमंतराव झोंबडे पाटील, तुका मेंबर, मानसिंगअण्णा, खंडराव खोत, संभा खंदारे, शामा कोळी, नामा आरेकर, भानूसिंग, शहाजी पाटील अशी काही मुख्य व्यक्ती चित्रणे आहेत.

गौण व्यक्तिचित्रणामध्ये अण्णा घोरपडे, बाबू सटाले, बाळा मगदूम, रामा-खोचरे, बाबू लकडे, आप्पू, तमदलगे, मलीकवाड, दुंडाप्पा, बावशा, धनपाल शिरोटे, लुकडा तिप्पान्ना, रामू पाटील, अण्णा, सहाले, आप्पा धनगर, गुंडा, बंडा, डफेदार, गणपा न्हावी, भरमू, रामा, सिंद्या, घनशाम, आत्ताराचा म्हातारा, हल्लाप्पा, मल्लाप्पा, बापू पाटील, बाळा पाटील, आत्माराम पाटील, संताजी पवार, डावरा भिमा, जयपाल मगदूम, दिनकर कांबळे, बापूसाहेब, दुंडा चांभार, बापू पाटील, संताजी पवार, डोईफोडे, बंडा जमदाडे, ईश्वर फडतरे, आनंदा फडतरे, शिगटे परीसा, बापूसाहेब गायकवाड, लिंगाप्पा डगरे, शिगटेसाहेब इ. अनेक पुरूष पात्रे या कादंबरीत वावरताना दिसतात.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

मुख्य पात्रे कादंबरीचे कथानक स्पष्ट करत असली तरी गौण पात्रामुळे कथानक पुढे सरकविण्यात मदत होते. मगदूम पवार हा किशाचा शिवारकरी आहे. तर डफेदार हा त्याच्या पासून थोडा लांब आहे. गावाला चिटकून त्याचा ऊस आहे. रामा पाटकरी हा बोरीगाव विकास सोसायटीचा पाटकरी आहे. रामा सोसायटीच्या समोरच्या बाकड्यावर धरून आणलेल्या कैद्यासारखा बसत असतो. सकाळी नऊ ते बारा सोसायटीत हजेरी लावायची आणि नंतर पाण्याकडे जायचे असे त्याचे काम होते. म्हणजे तो सोसायटीचा पाटकरी होता. भरमू हा सोसायटीचा शिपाई आहे. दहा ते पाच सोसायटीचे काम झाल्यावर भरमू जयसिंगअण्णांची खाजगी कामे करत असे. अण्णांनी खास स्वतःची कामे करण्यासाठी पगार देवून भरमूला सोसायटीत कामाला ठेवले होते. सिंद्या हा सोसायटीचे खत दुकान चालवतो. घनशाम हा गावातला गरीब शेतकरी आहे. त्यांचे बे एके बे असे शेतीचे काम चाले. रोज सकाळी गुरांना पाल्याचा भला जंगी भारा घेवून तो किशाच्या घरासमोरून जाई. डोईफोडे हा बोरीगावातील विविध कार्यक्रमात फोटो काढण्याचे काम करतो. तो फोटोग्राफर आहे. ईश्वर फडतरे हा किशाचा सासरा आहे. आणि आनंदा फडतरे हा किशाचा मेहुणा आहे. अप्पूचा ट्रॅक्टर बोरीगावात शेतीकामासाठी भाड्याने चालतो. सावळवाडे व तमदलगे यांचा ऊसाचा फड बियाण्यासाठी कारखान्याने खरेदी केलेला आहे. त्यांच्या फडाच्या व्यतिरिक्त दूसऱ्या कोणाचाही ऊस बियाण्यासाठी घ्यायला परवानगी नाही. तसेच ऊस आंदोलनाच्या वेळी बाबू सटाले, शहाजी पाटील, रामू पाटील, अण्णा सटाले, किशा खोत, रामा कोळी, बाळा मगदूम, आप्पा धनगर, गुंडा बंडा ही मंडळी गावातील संघटनेचे कार्यकर्ते होते. शिंगटे हे शेती अधिकारी आहेत. लिंगाप्पा डंगरे हा म्हातारा पाचवे मैलावर मळ्यात रहात असे. बँकेत पैसे काढायला आल्यावर त्याला चक्कर आली होती. तेव्हा तो सर्वांच्या परिचयाचा झाला. या व्यतिरिक्त गावकरी मंडळींमध्ये हॉटेलवाला हल्लाप्पा त्यांचा मुलगा मल्लाप्पा, बापू पाटील, बाळा पाटील, आत्माराम पाटील, संताजी पवार, डावरा भिमा, जयपाल मगदूम, दिनकर कांबळे, शामा, नामा, बळिशा, दुंडा चांभार, संताजी पवार, गणपा न्हावी, बंडा जमदाडे, धनपाल शिरोटे, लुकडा तिप्पाना इत्यादी मंडळी आहेत. 'साखरफेरा' मध्ये अशा काही व्यक्ति आहेत. ज्यांच्यामुळे पूर्ण गावाचे स्वरूप समजते.

माणसांच्या स्वभावाचे दर्शन घडते. संघर्षाचे स्वरूप समजते. ऊस आंदोलनाचे तीव्र स्वरूप चित्रित होते. वरील व्यक्तींमध्ये पुरूष व्यक्ती अधिक गुंतागुंतीच्या वाटतात.

या कादंबरीमध्ये पुरूषपात्रांची संख्या जास्त आहे. स्त्रीपात्रे, क्वचितच कुठेतरी वावरताना दिसतात. किशाची बायको बायजा ही साधी, अशिक्षित, घरकाम करणारी आहे. सुंदरी ही भरम्याची बायको आहे. ती जयसिंगअण्णांच्या मेजवानीच्या जेवणाच्या भाकरी करून देताना दिसते. इतर ठिकाणी कुठे ती कादंबरीत फारशी वावरताना दिसत नाही. फक्त ताई, सुभद्रा, दाताडी म्हणजे बाळी, चलन म्हणजे शालन, खुळी म्हणजे मंजी आणि कनेक्शन म्हणजे धुरपा म्हातारी असा सहाजणींचा पुड्ठा आहे. ह्या शेतात रोजाने जातात. ताई ही या पुठ्ठ्याची मुख्य आहे. इ. स्त्री व्यक्तिचित्रणे या कादंबरीत पहायला मिळतात. या कादंबरीमध्ये स्त्री पात्रे अगदी मोजकीच कामापुरती आलेली आहेत.

ग्रामीण माणसांची मानसिकता, पैशाअभावी होणारी कुचंबणा, काबाडकष्ट करून जगण्याचे सामर्थ्य असताना सुद्धा भांडवला अभावी काहीच करता येत नाही. ऊस आंदोलनाचेही तीव्र स्वरूप लेखकांनी शद्बबद्ध केले आहे. दरिद्री, स्वार्थी, लाचार, अगतिक स्वाभिमानी सदाचारी असे काही माणसांचे नमूने या व्यक्तिचित्रणामधून लेखकांनी दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्वात शेतकऱ्यांच्या जीवनाची कुटुंबाची जी परवड होते. ती विदारक आहे. तसेच ऊस आंदोलनाचे तीव्र स्वरूप आणि शेवटी त्या आंदोलनाला आलेले यश यांचे अत्यंत भेदक रीतीने वर्णन केले आहे.

'साखरफेरा' कादंबरीतील प्रत्येक पात्र वास्तव वाटते. घराघरातील एकंदर स्थिती, गावातील शिक्षित-अशिक्षित अशा प्रत्येकाची वेगवेगळी दुःखे आणी त्यांच्या आयुष्याची चित्तरकथा वेगळी पण ती अगदी बोरीगाव प्रमाणे इतर कुठल्याही पात्रातल्या शेतकऱ्याला अगदी आपली वाटावी अशी आहे. किशाच्या कुटुंबाची कथा केवळ उदाहरण मानल्यास ही सर्वसाधारण शेतकऱ्याची कथा मानता येईल. इथे कोणतेही पात्र ओढून ताणून बसवलेले दिसत नाही. प्रत्येक पात्र आपल्या स्वतःच्या स्वतंत्र वैशिष्ट्यांनी आपल्यासमोर येताना दिसतात. ही कादंबरी रूढ अर्थाने कुठल्यातरी चार व्यक्तिरेखांची कथा नाही. तर अनेक व्यक्तिरेखांचे मिळून एक जाळेच तयार झाले आहे. यामध्ये लेखक यशस्वी झालेले दिसतात.

१) किशा :-

किशा हा बोरीगावमधील एक गरीब कष्टाळू शेतकरी आहे. किशाचे बायको बायजा व मुलगा विकास असे छोटेसे कुटुंब होते. जीवापाड कष्ट करून बायजा व किशा आपला संसार चालवत होते. किशाचा चुलत भाऊ गजा यांच्यासारखे श्रीमंत होण्याचे, बंगला गाडी घेण्याचे किशाचे स्वप्न होते. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो सतत धडपडत असे. शेती बरोबर रोजचा घरखर्च चालविण्यासाठी किशाने गाय व म्हैस अशी जनावरे पाळली होती. कारण शेतीतून पैसे वर्ष सहा महिन्यांनी एकदम मिळणार मग रोजचा खर्च कसा चालवायचा.

परंतू नियतीला त्याची परीक्षा घ्यायची असल्यामुळे त्याच्या ऊसाच्या फडाला आग लागली आणि पन्नास टन ऊस जळून राख झाला. या संदर्भात किशा म्हणतो, ''आपला फड पेटला. लगी आपून हादरलो. ऊसाचा नादच डोस्कीतनं काढला. चारपाच वर्सामागं असचं झालतं. तवा पाऊसकाळ जादा झाला. रान गाराठलं, त्येच्यानं लावण कुचंबली. दुयारणी लावण केली तवा पर मेळ काय बसला नाही. मग कसाबसा ऊस वाढविला पर त्या वर्षी फटका बसला. त्या वर्सीतर लागवडीचा खर्च बी निगाला नाही. उलट सा-सात हजार अंगावरच बसलं. असं दोनदा झालंय आपल्या ऊसाचं मागिंद्या फटका बसला दोन सालं उलटली, तर ह्या साली ऊस पेटलान् चांगलाच चटका बसला. आपली ऊसाबाबतीत रासच जमंना''[१] त्यामुळे तो दुःखी होता. कमीत कमी रानात जास्त ऊसाचे उत्पादन काढण्याचे व गजा खोतासारखे श्रीमंत होण्याचे त्यांचे स्वप्न होते. परंतु ते पूर्ण होणे त्याच्या नशिबी नव्हते. ऊस जळल्यामुळे शक्तिपात होऊन गलितगात्र झालेला किशा कसा तरी सावरला आणि त्यानी कर्ज भागविण्यासाठी गोठ्यातली जनावरे विकली आणि आपल्या डोक्याचे टेन्शनं कमी केले. ह्या घटनेतून किशाची शेती पिकविण्यासाठी चाललेली अहोरात्र धडपड आणि पुन्हा वाट्याला आलेल्या दुःखातून पुन्हा सावरून उभी राहण्याची उर्मी स्पष्ट जाणवते.

''ऊस जळल्यापासून किशाला पांढऱ्या उंदराची स्वप्ने पडू लागली होती. स्वप्नात त्याला ऊस चांगला ज्योतिबाच्या सासणकाठीइतका उंच. शेंड्यावर फेट्यासारखा मलमलचा तुरा. पानं हिरवीगार. एक एक पान तलवारीच्या पात्यासारखं धारी. आश्चर्य म्हणजे ऊस माणसागत

किशाबरोबर बोलतोय.''[२] किशाला दोन–तीन वेळा ऊसाने फसविले तरी त्याची ऊस लावण्याची जिद्द काही कमी झाली नव्हती. तर त्याच्या स्वप्नातही ऊस येऊ लागला होता. एवढे प्रेम ऊसाविषयी किशाच्या मनात होते.

सकाळी उठल्यावरती किशा अंगणात मिसरी घासत बसून गावातून येणाऱ्या जाणाऱ्या माणसांच्या हालचाली न्याहाळत असे. तोंड धुवून चहा पिऊन पुन्हा अंगणातच बसे. कंटाळा आला की पंचायतीच्या ऑफिसच्या पटांगणात वडाच्या झाडाच्या कट्ट्यावरती जाऊन बसायचा. तिथं नाम्या, गुंडा, बाळीशा इत्यादी मित्र जमा व्हायचे. मग बिड्या ओढत गप्पांना रंग यायचा. तिथही बसून कंटाळा आला की घरी जाऊन जेवायचे आणि सोप्यात येऊन बिडी ओढून तिथेच आडवे व्हायचे. तेन्ही सांजे पर्यंत तिथच लोळत पडायचे आणि पुन्हा वेशीकडे जायचे. तिथून गणपा न्हाव्याच्या दुकानात. गणपा न्हाव्याचे व किशाचे चांगलेच पटत होते. दिवेलागणी होईपर्यंत न्हाव्याबरोबर गप्पा टाकत बसायचा आणि दिवेलागणी झाली की घराकडे यायचा असा किशाचा दिनक्रम होता.

या आधी किशाला असा वेड्यासारखा फिरताना कोणीच पाहिलं नव्हतं. खर तर शेतकामात किशा चांगला नावजिक. पण फड पेटल्यापासून त्याचे शेतीवरचे मनच उठले होते. या त्याच्या वागण्याने बायजाचे व त्याचे पटत नव्हते. बायजा किशाशी नीट वागत, बोलत नसे. जेवायला वाढून सोप्यात जाऊन बसे. आणि किशाचे जेवून झाले की स्वयंपाकघरात जात असे. किशाही तिला काही बोलत नसे. कारण त्याचे त्यालाच आपण कसे वागतो आहोत हे कळत नव्हते.

एकदा सकाळच्या वेळी कुडमुड्या जोशी किशाचा हात बधितल्यावरती किशाला त्याचे भविष्य सांगू लागला. किशाचा हात बधितल्यावरती कुडमुड्या जोशी म्हणाला, ''मनात तुज्या पापवासना राळ्या एवढी दिक्कल न्हायी. धुतल्या तांदळागत तुजं अंतःकरण हाय, ह्यो...हात सांगतोय!''[३] जोश्यालाही किशा प्रामाणिक वाटत होता. दुखावलेल्या किशाला जोश्याने आशेची नवीन किरणं दाखवली त्यामुळे तो उत्साही झाला होता. ऊसाची लावण करण्याची स्वप्ने पाहू लागला होता. तेव्हाच तुका मेंबरनी किशाला ऊस विकास योजनेची कल्पना सांगितली. किशालाही ऊस लागण करण्याची खूप इच्छा होती परंतु भांडवला अभावी तो लागण करू शकत नव्हता

कारण तो आधीच तोट्यात होता. योजनेतुन दहा हजाराचे कर्ज घेऊन लावण केली. आणि तो बिनधास्त झाला. परंतु त्याला एका बाजूला आनंद वाटत होता. आणि दुसऱ्या बाजूने दुःख वाटत होते. कारण भांडवल नव्हते म्हणून लागण करता येत नव्हती ती कर्ज काढून गेली त्यामुळे तो आनंदी होता. तर दुसऱ्या बाजूला लागण केली परंतु त्याचे पहिले बिल शेतकऱ्याच्या हातात पडणार नव्हते कर्जात वजा होणार होते. फायनल बिल मिळेल याची काही गॅरंटी नव्हती. त्यामुळे शेतकऱ्याला पैसे कधी मिळणार तर दुसऱ्या वर्षीच्या खोडव्याचे. या दोन वर्षात त्याने काय करायचे. दुध व्यवसायावरती काय भागणार. त्यामुळे सतत पैशाची चणचण शेतकऱ्यांच्या कुटुंबात जाणवत असते. इतर खर्चासाठी मग तो कर्ज घेत असतो. अशाप्रकारे तो कर्जाच्या विळख्यात अडकतो.

किशाचे त्याचा मुलगा विकास याच्यावरती खूप प्रेम होते. आपल्या मुलाने शिकावे नोकरी करावी असे किशाला वाटे. आपल्याला जे मिळाले नाही ते विकासला सगळे द्यायचे त्याच्या इच्छा पूर्ण करायच्या यासाठी किशा धडपडत होता. त्याची सर्व स्वप्ने विकासच्या पुढील जीवनावरती अवलंबून होती. कारण आपण काम करून मेलो. मुलाच्या वाट्याला तरी हे दिवस येऊ नयेत असे त्याला वाटे.

किशाने जेव्हा गजा खोतासारखं आपण वर्षानुवर्षे ऊसाशिवाय दुसरं पीक घ्यायचे नाही असा जेव्हा निश्चय केला. तेव्हा किशाचे मन थाऱ्यावर आले. किशा नेहमी गजाबरोबर इर्षा करायचा. गजासारखी गाडी घ्यावी बंगला बांधावा असे त्याच्या मनात राहून राहून येत असे. किशा नेहमी गजाच्या प्रगतीवरती जळत असे. त्याला वाईट वाटणे तसे सहाजिकच होते. कारण सख्खे भाऊ, एक सारखीच जमीन तरीही दोघांच्यात एवढी तफावत का?

किशाने ऊस विकास योजनेचे कर्ज काढून लागण केली. आंदोलनाच्या गडबडीत लागण केल्यावरती त्याला जाणे शक्य झाले नाही. लागण केल्यावर दोन-तीन आठवड्यानी तो गेला तर लागण चांगली उगवली होती. शेजारच्या शिवारक्याने हाक मारून किशाला ऊसावरती लोकरी मावा आलेला दाखविला होता. त्याच्या ऊसावरती आला नव्हता पण आज ना उद्या त्याच्या ऊसावरती लोकरी मावा येणे शक्य होते. त्यामुळे किशा अस्वस्थ झाला.

अशाप्रकारे किशाला म्हणजे शेतकऱ्याला अनेक संकटांना सामोरे जावे लागते. परंतु त्यांना आधार देणारे शामा, गुंडा, बाळा असे जिवलग मित्र असतात, त्यामुळे ते दुःखातुन थोड्या वेळेसाठी का होईना सावरले जातात.

किशा खोतासारख्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जीवनाचा वेध, अतिशय बारकाव्याने, जशाच्या तसा घेण्याचा प्रयत्न मोहन पाटील यांनी करून शेतकरी जीवनाची शोकांतिका मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**२) बायजा खोत :-**

बायजा ही किशाची बायको आहे. बायजाचे माहेर पाचव मैलापासून जवळ असलेल्या फडतऱ्यांच्या मळ्यात होते. बायजाच्या वडिलांचे नाव ईश्वरा फडतरे आहे. तर भाऊ आनंदा फडतरे हा कष्टाळू होता. त्यांची परिस्थिती चांगली होती. त्यामुळे बायजाला माहेरात कधी कोणत्या गोष्टीची कमी नव्हती. तरी देखील ती बोरीगावत किशा जवळ आनंदाने संसार करीत होती.

किशाच्या फाटक्या संसाराला कायम ठिगळ लावत असायची तरी देखील किशा तिच्यावरती रागवत असे. तिला सोडण्याच्या गोष्टी करीत असे तेव्हा ती किशाला म्हणे, ''मी बी फडताऱ्याची लेक हाय. आस्सीलाची हाय. कुठनं उठून आल्यासी न्हायी. मूठबर मिशा बाळगून हिंडलं म्हंजे लई शान म्हणत न्हायीत. हितं चुलीपुढं बसून मला हाडं घालाय लागत्यात. तुमचं काय जातंय. त्वांड दिलंय देवानं तर जरा चांगलं बोला.''[४] अशा ठसकेबाज उत्तराने किशाला गप्प करत असे. कारण किशाच्या मोडक्या संसाराचा भार तिने जिवापाड सांभाळला होता.

किशाचा ऊस जळल्यामुळे तो दुःखी झालेला. पूर्वीसारखे काम न करता तो दिवस-दिवस गावात बिड्या ओढत बसत असे. त्यात त्याने कर्ज भागविण्यासाठी गोठ्यातील जनावरे विकली त्यामुळे बायजा खूप चिडली होती. त्यातच ऊस विकास योजनेचे पैसे घेऊन किशा ऊस लागण करत होता. ही किशाची बेरीज वजाबाकी बायजाला अजिबात पटत नव्हती त्यामुळे वारंवार त्या दोघांमध्ये भांडणे होत होती.

किशाला स्वप्नात पांढरे उंदीर, ऊस स्वप्नात दिसत होता त्यामुळे तो झोपेतच चावळत

असे हे पाहून बायजा किशाला म्हणते, ''तुमाला लाटंच्या आण्णा डागदराला दावून वाईस शेक दिवून आणाय पायजे.''[५] बायजाला वाटते आपला नवरा वेडा झाला आहे. म्हणून तो झोपेत असे काहीही बडबडतो आहे. यातुन बायजाचे आपल्या नवऱ्यावरती किती बारकाईने लक्ष होते हे लक्षात येते. तसेच या गोष्टीचा तिला रागही येत असे. काही वेळा तर तिला वाटते किशावरती कोणी करनी केली? का त्याला लागीर झाले? अशा प्रश्नांनी तिच्या डोक्यात गोंधळ होत असे. परंतु ती आपले दुःख कोणाला सांगू शकत नव्हती म्हणून एकटीच रडत बसत असे. काही झाले तरी आपल्या परिस्थितीचा मागमूस व बायजा आपल्या माहेरी लागून देत नसे यातून दुसऱ्या कोणाची मदत घ्यायची नाही अशी स्वाभिमानी वृत्ती दिसून येते.

तानाजी राऊ पाटील बायजाच्या व्यक्तिमत्वाविषयी म्हणतात, ''ही बाई कष्टाळू आहे. प्रपंच अतिशय काटकसरीने करणारी आहे. त्यासाठी नवऱ्याने व्यवस्थित वागले पाहिजे. सर्व गोष्टी त्याने समजून उमजून केल्या पाहिजेत यासाठी ती धडपडते. प्रसंगी त्याच्यावर वैतागते.''[६] कारण तिलाही आपला संसार सुखी-समाधानी चालविण्याची इच्छा असते परंतु किशाच्या तोंडचा घास वेळोवेळी हिसकावला जावून त्याच्या नशिबी दुःख येते. बायजा ही त्यांची बायको असल्यामुळे त्या दुःखाच्या झळा तिलाही सोसाव्या लागतात.

किशा सकाळी घरातून बाहेर पडताना बायजा त्याला रागाने बोलली होती. त्यामुळे तो शांतपणे घरातून निघून गेला होता. घरी आल्यावरही तो गप्पच होता. त्यामुळे बायजाच्या जीवला घोर लागला होता. आपण एवढ्या भल्या मोठ्या गड्याला रागाने काहीही बोललो. याचे तिलाही खूप वाईट वाटत होते. नवऱ्याचा अबोला तिच्या जीवाला पीळ पाडत होता. कितीही भांडत असला आणि कसलाही असला तरी तिचे किशावरती खूप प्रेम होते. याचा प्रत्यय आपल्याला इथे येतो.

बायजाला नवसाने बारा वर्षानी मुलगा झालेला. त्याचे नाव विकास होते. त्याच्यावरती बायजाचे खूप प्रेम होते. विकासने बापासारखे अडाणी राहू नये. शेती करू नये. खूप शिकावे, मोठा साहेब व्हावे अशी बायजाची इच्छा होती. एकदा विकास किशाबरोबर रानात निघाला होता. तेव्हा ती विकासला म्हणाली, ''विकाशा... त्वांड धून च्या घे. न् अभ्यासाला बस. का तू बी आपल्या बावाणी रानात जाऊन शेपट्या मुरगाळणार हाईस बैलांच्या?''[७]

बायजा किशाच्या संसाराचा मोडका गाडा ओढून कंटाळली होती. त्यामुळे किमान मुलाच्या राज्यात तरी चार दिवस सुखाचे यावेत म्हणून तीची विकासला शिकवायची खूप इच्छा होती.

प्रसंगी नवऱ्याशी भांडणारी बायजा फणसा सारखी वरून काटेरी असली तरी आतुन गऱ्यासारखी मऊ, प्रेमळ होती. नवऱ्याचा अबोला तिला चैन पडू देत नाही. त्याने प्रेमाने चार शद्व बोलावेत अथवा भांडण तरी करावे असे तिला वाटत असते. मुलगा विकास हा तिचा जीव की प्राण होता. कष्ट करून मोडकळीस आलेला संसाराचा गाडा पुन्हा सुरळीत चालविण्याची जिद्द होती. अशाप्रकारे जिद्दी, स्वाभिमानी, प्रेमळ, भांडखोर अशा बायजाची व्यक्तिरेखा मोहन पाटील यांनी रेखाटली आहे.

**३) शामा :-**

शामा हा किशाचा जीवलग मित्र होता. किशा, नामा, शामा हे मित्र सुख-दुःखाच्या वेळी एकमेकांच्या मदतीला धावून येत. शामा हा जयसिंगअण्णांचा विश्वासातला कार्यकर्ता होता. तसेच तुका मेंबरांचाही त्याच्यावरती खूप विश्वास होता. त्यामुळे मेंबर, जयसिंग अण्णा आपल्या महत्वाच्या गोष्टी शामाला सांगत असत.

शामा हा अतिशय हुशार होता. पूर्वीचा सावलीच्या मोडलेल्या तमाशातला सोंगाडी होता. त्यामुळे त्याला हजरजबाबाची सवय लागलेली. काही वेळातर शामाचे बारीक-सारीक डावपेचही लक्षात येण्यासारखे होते. शामा कसा आहे या संदर्भात जयसिंग अण्णा म्हणतात, ''की तो अतिहुशार माणूस आहे. कुणाफुढं कोन्त्या वेळेस कसं वागावं हे त्याच्याकडनं शिकण्यासारखं आहे-त्याला कळतं सारं''[८]

किशाचा ऊस जळला होता तेव्हा त्याला सहानुभूती दाखवून पुन्हा जोमाने उभे राहण्यास मदत करण्याचे काम शामाने केले होते. तसेच अण्णांना सांगून ऊसाचे बिल रोख द्यायला सांगितले. बँकेतील साहेबाना कर्ज थटवून ठेवाय सांगितले. किशाची मोठ-मोठ्या लोकांकडे ओळख असून त्यांचा तो पुरेपूर फायदा, आपल्या शेतकरी बांधवांची थटलेली-नडलेली कामे करून घेण्यासाठी करीत असे. त्याची विश्वासू, हजरजबाबी, हुशार व परोपकारी वृत्ती स्पष्ट होते.

शामा वरून जरी बिनधास्त दिसत असला तरी आतुन त्याचंही काळीज गरिबीने करपून गेलेले याचा प्रत्यय काही प्रसंगातुन येतो. एकदा शामाचे डोक थाऱ्यावरती नव्हते म्हणून तो दारू पिण्यासाठी घेऊन गेला. दारू इतकी चढली की आपल्या मनातील दुःख नामाला बोलून दाखवू लागला. दारूच्या नशेत खातूनची चेष्टा करत होता. शामाची मुलगी डिलेव्हरीला आली होती. ऊस लागणही करायची होती. ऊस लागणीसाठी दहा हजार कर्ज घेतले होते. त्यातील मुलीच्या ऑपरेशनला सहा हजार खर्च होता. उरलेल्या चार हजारात लागण कशी करायची या काळजीने तो पोखरला जात होता. तेव्हा किशाने व रामाने त्यावरती पर्याय काढून त्याला संकटातून बाहेर काढले. त्यामुळे तो थोडा आनंदी झाला. त्याला डोक्यावरचे ओझे कमी झाल्यासारखे वाटते. माणूस कितीही धाडसी असला तरी आर्थिक समस्येपुढे त्याचा काहीही पर्याय नाही. आर्थिक समस्येमुळे त्याचे पूर्ण रूपच बदलून जाते तो अगतिक होतो.

शामा हा पूर्वी तमाशात असल्यामुळे कोणत्याही गोष्टीवरती लगेचच कवने रचन्यात तो तरबेज होता. त्यामुळे शेतात काम करताना, ऊसाची लागण करताना शामा गाणं म्हणत असे. काम करताना तो ते हसत खेळत करत असे त्यामुळे कोणतेही कष्टाचे काम बघता–बघता संपत असे. तसेच ही गाणे रचताना तो गावातील लोकांची प्रकरणे, त्यात गुंफून विनोद निर्माण करत असे त्यामुळे ही गाणी ऐकता ऐकता हसत खेळत लोक काम करत असत. या संदर्भात मोहन पाटील म्हणतात, ''कुठल्याही कामात शामा असला की त्याच्या संगतीत किती काम केलं तरी अजिबात कंटाळा यायचा नाही. किती अवघड काम असो, सारं हसत–खिदळत करायचं ही शामाची सवय होती. तो कधी स्वस्थ बसतच नव्हता. काही ना काही शक्कल काढून साऱ्यांना डिवचत राहणारच''[१] शामा हा शीघ्र काव्य करण्यात तरबेज होताच शिवाय त्यातील कवने विनोदबुद्धीने रंगवून लोकांचे मनोरंजन करत असे.

ऊसाला दर मिळावा म्हणून संघटना उभारण्यात आली होती. त्या संघटनेचा महत्त्वाचा विश्वासू कार्यकर्ता म्हणून शामाला ओळखले जात होते. त्या काळातच शामाला तुका मेंबरनी भेटायला बोलवले. जावे का जाऊ नये. या विचारात तो गेला. मेंबर नेहमीपेक्षा वेगळ्याच नादात होते त्यांचा चेहरा गंभीर झाला होता. हे पाहून शामा घाबरला मेंबरच्या जवळ जावून शांतपणे बसला.

तेव्हा मोहन पाटील म्हणतात, ''शामाच्या मुद्रेवर नेहमी खेळकर भाव असायचे. भेट झाल्या झाल्याच समोरच्या माणसावर काही कुभांड रचून गमतीनं हसवून त्याला तो मोकळा करूनच सोडायचा. मग तो माणूस कोणीही असो. तो त्याची खोड काढणार, चेष्टा करणार, त्याला हसवणार, मग कामाचं बोलणार.''[१०] म्हणजे शामा हा कितीही गंभीर वातावरण असले तरी तिथे विनोद निर्माण करून वातावरण शांत करत असे. परंतु आंदोलनाच्या काळात तो कारखाना प्रशासनाच्या बाजुच्या पक्षातील मेंबरना भेटण्यासाठी गेल्यामुळे तो ही गंभीर अवस्थेत होता. मेंबरनी शामाला त्यांच्या जवळची विश्वासातील गोष्ट सांगण्यासाठी बोलवले होते. नंतर ऊस दर प्रश्न, कारखाना प्रशासन, आंदोलन, सहकार या गोष्टीवरती दोघांच्यात मनमोकळेपणाने चर्चा झाली. यावरून शामावरती मेंबरांचा किती विश्वास होता हे स्पष्ट जाणवते.

किशाचा सासरा मेल्यावरती शामा किशा बरोबर धनाला गेला होता. तेव्हा तिथे बंडा, शामा, किशा, नामा यांच्यात बोलणे चाललेले. तेव्हा शामा त्याचे मरणाविषयीचे विचार इतरांना सांगत होता तो म्हणाला, ''ह्यो जलम हाय. सारीच ह्या वाटंनं एक ना एक दिवस जाणार. पर परतेकाला वाटतंय आपून लईदी जगावं. आपून जगावं. आपली बायकापोरं जगावीत. सगळी सगळी आपल्याबरोबर जगावीत. कोण मागं कोण फुडं नको–मरणाचं भ्या परतेकालाच हाय. कुणाला मरावं वाटंल? मढ्याजवळ असतोय तवर मरणाच्या गोष्टी. त्येचं भ्या. ही एवढी वेळ सरली की मग ज्यो त्यो उठून पोटाच्या मागं लागतोय. देवानं पोट दिलं नसतं तर माणसाला मरणाचा इसर पडला नसता पोट भरायच्या नादात माणूस मरण रसारतंय. कसं अजाब केलंय बगा हे देवानं.''[११] खरचं किशाच्या बोलण्यात तथ्य होते. कितीही जवळची प्रेमाची व्यक्ती वारली तरी लोक चार दिवस दुःख मानून प्रसंगी मनात दाबून पुन्हा पोटाचा खळगा भरण्यासाठी कामाला लागतात. म्हणजे देवाने माणसाना विसरणे ही लाखमोलाची गोष्ट दिली आहे आणि त्यावरतीच माणूस आज धाडसाने उभा आहे.

अशाप्रकारे शामा हे व्यक्ती साखरफेरा मध्ये सतत वावरताना दिसते. बोरीगावमधील सर्व लोक त्याला जवळचा मानत. गावातील दोन्ही राजकीय पार्टीमधील ठराविक लोक सोडले तर इतर सर्व लोकांचा शामावरती विश्वास होता. असा हा शामा उत्फुर्त व शीघ्र कवित्व करणारा

हुशार, चलाख, हजरजबाबी, बेरकी, परोपकारी, व्यक्तिमत्वाचा होता. परंतु तो ही गरिबीने अगतिक झाला होता.

**४) तुकामेंबर :-**

तुका मेंबर हे बोरीगावातील पुढारी होते. सकाळी पाठीला दप्तर बांधून शाळेत जाणाऱ्या पोरासारखे न चुकता ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये येऊन कालच्या तारखेचे पेपर वाचत बसत. मेंबर हे हुशार होते. त्यातही त्यांचा राजकारणाचा अभ्यास खूप होता. त्यांचे बोलणे गोड, वागणे टापटिपीत, अगदी बगळ्यासारखे कधीही पहा स्वच्छच असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

मेंबराना येता-जाता वाटेत भेटल्यानंतर लोक नमस्कार करत. तेव्हा मेंबर त्यांचा नमस्कार स्वीकारून आपल्या मोकळ्या सोनकावी रंगाच्या तेलकट टाळूवरून फिरवून हात फिरवायचे. तोच हात टाळूवरून झाल्यावर बोटांची चिट्चिट् चिटकी वाजवायचे त्या चुटकीचाच हात नेहरू शर्टाच्या खिशात घालून आपले पांढरे शुभ्र दात स्वच्छपणे दाखवत म्हणायचे. अरेच्या विसरलोच तुझ्याकडेच काम होते. त्यांची गोरीपान जिवणी स्वच्छ हसणं बघून पुढ्यातला माणूस काकळून विचारायचा. काय म्हणता मेंबर? ते तुझ्या सोसायटीच्या कर्जाचं काम. मग पुढच्या गरीब शेतकऱ्याला आनंद व्हायचा आणि भक्तिभावाने तुका मेंबरपुढे वाकून तो पाय धरू लागायचा. तितक्यात देव अदृश्य झाल्यागत त्यांचे पायच तिथून गायब व्हायचे आणि पाय धरायला खाली वाकलेला माणूस त्यांच्या पायधुळीकडे पहात वेड्यासारखा जागेवरच रहायचा असा वेगळाच स्वभाव मेंबरांचा होता.

तुका मेंबर श्रीमंत नव्हते. त्यांच्या पोटाला पोरही नव्हते नुसत्या खादीवर त्यांनी जन्म काढला. तशी कोणती महत्वाची खुर्ची ही त्याना कधी मिळाली नव्हती. फक्त एकदाच ते ग्रामपंचायतीवरती निवडून आले होते. त्यानंतर ते पदही त्यांनी सोडले. पण तेव्हा पासून लोक त्यांना तुका मेंबरच म्हणू लागले. मेंबर विषयी लोकांच्या मनात नितांत आदर होता. भागातले सर्व पुढारी त्यांचा शद्ब पाळायचे त्याना कोणत्याच पदाची इच्छा नव्हती. सर्व नेतेच त्यांचा शद्ब झेलत या संदर्भात शामा म्हणतो, ''तुका मेंबरांकडे दट्ट्या लावून ते कामं करून घेतात. पाणी सोसायटीचे जयसिंगअण्णा ग्रामपंचायतीचे सरपंच मानसिंगअण्णा, इतकंच काय खंडेराव येवढा तिरसट

तोही कधी कधी त्यांचं ऐकतो. कारखान्यावरचा वांड संचालक संभा खंदारे तुका मेंबरांनी सांगितलं म्हटल्यावर मांजरागत गप्प. झोंबडे-पाटीलही त्यांचा सल्ला घेतात. तुकाराम महाराज अशी आदराने हाक देतात.''[१२]

तुकाराम गावातील लोकांची कामे निःस्वार्थीपणे करून देतो. त्यातच त्यांनी आपले आयुष्य घालवले होते. शेतकऱ्यांच्या हितासाठी ते नेहमी धडपडत. शेतकऱ्यांचा विकास व्हावा म्हणून कारखान्याला विविध योजना आखायला सांगत. परंतु दिवसेंदिवस ते दुःखी होऊ लागलेत कारण सहकारात सर्व भ्रष्ट कारभार चालला होता. शिपायापासून चेअरमनपर्यंत सर्वजण भ्रष्ट झालेले शेतकऱ्याचा विचार करायला कोणी तयार नव्हते. यासाठी जयसिंग अण्णांसारखी माणसे पुन्हा राजकारणात घालुन सर्व कारभार शुद्ध करायचा आहे. त्यासाठी ते प्रयत्न करत आहेत. कारण त्याना माहित होते आपले वय झाले आपण वाटून सुद्धा काहीही करू शकत नाही. मेंबरांना गांधीजीनी निर्माण केलेला सहकार पुन्हा पूर्ववत करायचा होता. या संदर्भात तानाजी राऊ पाटील, ''सहकाराचे राजकारण न होता. निकाय सहकार राहिला पाहिजे असे त्याला वाटते. चांगल्याची पाठराखण करणारा आणि वाईट प्रवृत्तीच्या माणसांना खडे बोल सुनावणारा तुका मेंबर होता. त्याचा वचक सर्वांच्यावर होता त्यामुळे त्याच्या समोर बोलण्याची हिंमत कोणाला होत नव्हती.''[१३]

तुका मेंबर हे स्वदेशीचा अभिमान असणारे व स्वदेशीच परिधान करणारे गरिबांचा विचार करणारे शांत, निःस्वार्थी व संयमी व्यक्तिमत्व होते. त्यांनी नेहमीच दुसऱ्यांच्यासाठी विचार केला त्यातून त्यांची परोपकारी वृत्ती जाणवते तर लोकांची कामे करताना कोणताही भ्रष्ट व्यवहार केला नाही यातुन प्रामाणिकपणा जाणवतो. कोणतेही पद नसताना प्रत्येक पुढाऱ्यावरती आपले वर्चस्व असणारे मेंबर कर्तव्यदक्ष पुढारी होते. सहकाराचा कारभार त्यातील राजकारण, पुढारी, अधिकारी पूर्वीसारखे शुद्ध असले पाहिजेत अशी त्यांची इच्छा होती. व ती पूर्ण करण्यासाठी सतत धडपडत होते. आजच्या भ्रष्ट काळात एवढ्या प्रामाणिकपणे कार्य करणारे तुका मेंबर हे आगळे वेगळे व्यक्तिमत्व होते.

५) जयसिंगअण्णा बातरे :-

जयसिंग अण्णा बातरे हे बोरीगाव विविध कार्यकारी विकास सोसायटीचे चेअरमन होते. त्यांचा स्वभाव एक घाव दोन तुकडे असा होता. एकदा नियम म्हणून बदल झालेला पण सोसायटी त्यांच्याच ताब्यात होती. गावातल्या हजारभर एकर बागायतीत सोसायटीच पाणी खेळत होत. सोसायटीच्या तळाशी चार मोठे दुकान गाळे होते. खत विभाग, स्वस्त धान्य दुकान, रॉकेल डेपो, तिथं उघडले होते. पहिली सात-आठ वर्ष विकास कामाचे हे विभाग जोरात चालले पण त्यातली धान्य, रॉकेल पुरवठा योजना एका-एकी बंद पडली, खत विभाग तेवढा सुरू होता. त्याची गरज होती आणि त्याला पर्यायही नव्हता. म्हणून आता बोरीगावची विविध कार्यकारी विकास सोसायटी सहकारी तत्वावर चालणारी पाणी सोसायटीच फक्त राहिली होती. बाकीच्या योजनांचा बोऱ्या वाजला होता. लोक म्हणायचे, ''अण्णानं धान्य खाऊन संपवलं आणि वर रॉकेलही पिऊन टाकलं. खरं खोट जयसिंगअण्णांनाच ठाऊक. अण्णा पाणी सोसायटी तेवढी प्रामाणिकपणानं चालवत होते. त्यातही खूप तक्रारी होत्या. पण अण्णा त्या साऱ्या तक्रारी, अडचणी निपटून काढायचे''[१४] परंतु हे सर्व अण्णांनी बंद पाडले नव्हते. यापाठीमागे दुसऱ्या पार्टीचे कारस्थान होते. तसे अण्णा प्रामाणिक होते.

अण्णांचा सोसायटीतील भरमू हा शिपाई अत्यंत एकनिष्ठ होता. अण्णांनी सोसायटीच्या पगारावर त्याला पोसले होतं. भरमूला जयसिंगअण्णाच्या सर्व भानगडी ठाऊक, जयसिंग अण्णांची एक डायरी म्हणजे भरमू. अण्णा कुठे आहेत. कुठे गेलेत हे त्यांच्या घरातील लोकांना माहीत नसते. पण ते भरमूला माहित. भरमूची बायको सुंदरा व अण्णा यांचे अनैतिक संबंध होते. तरीही भरमू अण्णांना काही म्हणत नसे. का? एवढ्या मोठ्या गोष्टीला तो का प्रतिकार करू शकत नव्हता. एवढे काय अण्णांच्यात त्याने पाहिले होते की वेड पांघरून पेडगावला जाण्याचे सोंग तो करत होता.

साडे-अकराच्या सुमारास हमखास अण्णांची फेरी सोसायटीकडे असे. तास-दोन तास सोसायटीत थांबून ते जे बाहेर पडायचे ते दुसऱ्याच दिवशी पुन्हा सोसायटीत यायचे. क्वचितच मीटिंग साठी नाहीतर महत्वाच्या कामासाठी ते थांबायचे. त्यांच्या मागे खूप कामे



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

असत. बारीक-सारीक कामे घेऊन ते कारखान्यावर, पंचायत समितीकडे, जिल्हा परिषदेत जायचे. गावातल्या माणसांची आजूबाजूच्या ओळखीच्या माणसांची कामे ते मन लावून करत.

अलिकडे महात्मा साखर कारखान्याच्या संचालकपदासाठी त्यांचा प्रयत्न चाललेला. काही क्षुल्लक कामासाठी ते दिवसेंदिवस कारखान्यावर पडून असायचे. काम तरी काय असणार. एखाद्या सभासदाच कार्ड काढून आणून दे. नाहीतर कुणा शेतकऱ्यांची ऊस बिलातली कपात रक्कम बँकेत जाऊन मॅनेजरला सांगून पटवून ठेव. आणि त्या शेतकऱ्यांच्या हाती जादा पैसे कसे पडतील असे करत. अशी शुल्लक परंतु शेतकऱ्यांच्या दृष्टिने हिच कामे मोठी व महत्वाची होती. अशा कामातून अण्णांना माणसांचा दुवा मिळायचा. कामाच्या निमित्ताने अधिकाऱ्यांच्याही ओळखी घट्ट व्हायच्या. मग संधी साधून एखाद्याच्या कामातून हजार-पाचशे काढून अण्णा अधिकाऱ्यांना ओली पार्टी देणार. तर कधी अधिकाऱ्यांच्या रात्रीच्या बिछान्याचीही साग्रसंगीत व्यवस्था करून देणार. जयसिंगअण्णा तसे सामान्यत लोकप्रिय अधिकाऱ्यांना तर अधिक प्रिय. या सेवेचा फायदा आपण का उठवू नये. असं वाटूनच ते संचालक पदाच्या रेसमध्ये उतरले होते. या संदर्भात स्वतः जयसिंग अण्णा म्हणत, ''पुढच्या वर्षी फॅक्टरीत संचालक पद आपल्याला मिळाय पायजे. आयला किती वर्ष झाली हितंच कुजतोय. राबायचं मी आणि खुर्च्या दुसऱ्यांनी हेंच्या राज्यात प्रामाणिक माणसाला किंमतच न्हायी. आता आपून का गप्प बसायचं? आपलं नाणं खणखणीत हाय. आपला गाव धरून बाजूची चार गावं मी सांभाळतोय. हिकडं का तिकडं हालू देत न्हायी. माज्या जीवावर हितलं दोन संचालक निवडून येत्यात. धा वर्षे असं चाल्लंय. माजी कोणसुद्धा दखल घेत न्हायी. आता मी ठरवलंय पुढच्या निवडणूकीत रेसमध्ये उतरायचं पद मिळवायचंच.''[१५] कारखान्यातील मोठ्या अधिकाऱ्यांनी संधी मिळताच आपल्या नावाचं तुणतुण चेअरमनपुढे वाजवावं. त्यातून चेअरमनच्या मनात आपली छबी तयार व्हावी. संचालक मंडळात आपलं वातावरण तयार व्हाव आणि पुढच्या कारखाना निवडणूकीत आपला नंबर लागावा. हा त्यांचा हेतू होता. सर्व ताकदीनिशी त्यांनी हा प्रयत्न चालवलेला होता. कारण अण्णांना आता गावतल्या सोसायटीचा कंटाळा आला होता. तो त्यांच्या वागण्या-बोलण्यातून दिसत होता. तसे अण्णा



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

प्रामाणिक होते. या संदर्भात तुका मेंबर म्हणतात, ''कितीतरी वर्षे अण्णा पाणी सोसायटी चालवतोय. कुणाचा एक पैसा घेतला नाही. अण्णांच कार्य आहे. त्यानं चार गावं नीट सांभाळलीत. त्यांचा वचक आहे. ते बिचारे मागे पडलेत. त्यांना संधी पाहिजेच.''[१६]

जयसिंगअण्णा हे प्रामाणिक व गरिबांचा कनवाळू असणारे कर्तव्यदक्ष नेते होते. त्यामुळे त्यांना वरच्या राजकारणात संधी मिळावी असे मेंबरांचे मत होते.

किशाचाही ऊस जळल्यानंतर त्याला धीर देऊन तुझी सोसायटीची बाकी थटवून ठेवतो. ऊसाचे रोख बिल द्यायला सांगतो. घाबरू नको. नव्या जोमाने उभे रहा. अशा पद्धतीने त्यांच सांत्वन करतात. किशाच नव्हे तर प्रत्येक शेतकऱ्याविषयी अण्णाना प्रेम होते. पुढची पार्टी बघूनच अण्णा त्यांच्या कामातून पैसे काढत. नाहीतर गरीब शेतकऱ्यांची कामे तशीच फुकट करून देत. या संदर्भात तानाजी राऊ पाटील म्हणतात, ''जयसिंग अण्णा बातरे हे लोकांच्यामध्ये मिसळून वागणारे कार्यकर्ते होते. कुणाकडून दारू कोंबडीची पार्टी कशी खायची हे त्यांना बरोबर माहीत होते''[१७]

कारखान्याचे चेअरमन झोंबडे पाटील यांची सत्ता टिकावी म्हणून अण्णा जीवाचे रान करीत. जरा कोणी विरोध दाखवला तर अण्णा कधी प्रेमाने तर कधी धाक दाखवून विरोधकांच तोंड बंद करीत. पाटलांचाही अण्णांच्यावरती खूप विश्वास होता.

अण्णा हे गावातील शेतकऱ्यांची कामे आनंदाने करत. त्यात त्यांना कमीपणा वाटत नसे. उच्च नीच असा भेदभाव ते करीत नसत. शेतकऱ्यांचा कळवळा, सहानुभूती असणारे राजकारणातील प्रामाणिक नेते म्हणजे जयसिंग अण्णा होते.

### ६) भानुसिंग रजपूत :-

भानुसिंग हा शेतकरी संघटनेचा प्रमुख कार्यकर्ता होता. तसेच भानुसिंगने सक्षम शेतकरी संघटना उभी करण्यासाठी गेली दहा वर्ष रात्रं दिवस अभ्यास करून महाराष्ट्रभर शेतकरी आंदोलनास जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेतला. आणि त्यावरती विचार करून शेतकरी संघटना उभी केली. शेतकऱ्यांच्या हितासाठी संघर्ष करणारा हा नेता होता.

भानुसिंगने शेतकरी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच ऊसाला योग्य भाव मिळण्यासाठी शेतकरी संघटना उभी केली होती. आजूबाजूच्या गावातून रान पेटवले होते. बोरीगाव मध्ये तर सर्वात जास्त संघटनेचे वारे वहात होते. ऊसकरी शेतकऱ्यांना तर भानुसिंग खूप मोठा आधार होता. कारखान्याचे चेअरमन झोंबडे पाटील दरवर्षी शेतकऱ्यांना भाषणातून गोड–गोड बोलून ऊसाला योग्य दर न देण्यासाठी परावृत्त करत होता. कारखाना कसा संकटात आहे या भूलथापांना लोकही भूलत होते. आणि शांत बसत होते. हे सर्व राजकारणाचे डावपेच भानुसिंगने जाणले होते. म्हणून भानुसिंगने शेतकऱ्यांच्या हक्काला न्याय मिळविण्यासाठी संघटना उभी करून जोमाने तयारीला लागला होता. काहीही झाले तरी ऊसाला योग्य दर मिळाल्याशिवाय आंदोलन मागे घ्यायचे नाही. या प्रवृत्तीने त्याने सर्वांना तयार केले होते. या संदर्भात भानुसिंग म्हणातो, ''आंदोलन चालू ठेवयाचं हे आंदोलन कुण्या एका साखरसम्राटाविरूद्ध नाही लक्षात ठेवा. हे आंदोलन भारतातल्या संबंध ऊसकरी शेतकऱ्यांचं हाय. आणि ऊसाचा हमी दर बांधून देणं हे सरकारचं काम आहे. तेव्हा असं मनात आणू नका. एकदा सरकारनं दर जाहीर केला की, सगळ्या कारखान्याला ते बंधनकारक आहे. आमचं भांडण आता सरकारशीच आहे.''[१८]

आंदोलीनाची कामे सर्वत्र अहिंसक मार्गाने चाललेली परंतु मध्येच संभा खंदारे दांडगाव्याने ऊस कारखान्याला न्यायला लागला. तेव्हा दोन्ही पक्षात मारहाण झाली. खंदारेच्या लोकांनी भानुसिंगला एकटे गाठून मारहाण केली. तेव्हा एक काठी त्याच्या डोक्यात बसली तशी रक्ताची चिळकांडी उडाली भानुसिंग जखमी झाला.

ऊसाला दर मिळाला तर तो भानुसिंगमुळेच बाकी कोणी नेता उपयोगाचा नाही. अशी पक्की खात्री सामान्य शेतकऱ्यांना वाटत होती. आणि गावोगावच्या सभातून होणारे त्यांचे भाषण ऐकून वाचून शेतकऱ्यांच्या मनात विश्वास बळकट होत होता. भानुसिंग आता खरोखरच चिडला होता. त्याला या प्रश्नाचा शेवटच लावायचा होता. म्हणून त्याच्या शद्वांना धार चढली होती. शेतकऱ्यांच्या हक्कासाठी त्याने आपल्या जीवाचीही पर्वा केली नाही. शत्रू पक्षाच्या काठ्या डोक्यात झेलून शेतकऱ्यांना त्याने न्याय मिळवून दिलाच आणि सर्व शेतकरी बांधवांच्यात मानाचे स्थान मिळवले होते.

भानुसिंगने भाषणाने वातावरण तापवले होते. शेतकऱ्यांचा विश्वास जिंकला होता. त्यात त्याला झालेली मारहाण म्हणजे त्याला मिळालेली सहानुभूती प्रेम होते. त्यामुळे सर्वत्र वातावरण संतप्त झाले. परिस्थिती हाताबाहेर जावू लागली तेव्हा सर्वत्र यंत्रणा हलली आणि सरकारने दर जाहीर केला. भानुसिंगचे आंदोलन यशस्वी झाले सर्वत्र आनंदी आनंद झाला. मूर्ती लहान पण किर्ती महान अशी कामगिरी त्याने बजावली. अल्पकाळातच तो मोठा नेता झाला. याचे दुःख कारखाना प्रशासनातील नेत्यांना झाले. परंतु आता भानुसिंग हा सर्व शेतकऱ्यांचा आवडता नेता झाला होता. त्यांच्या हक्कांना न्याय मिळवून देणारे खंबीर नेतृत्व उदयाला आले होते

**भाषाशैली :-**

भाषा हे प्रत्येकाच्या मनातील भाव-भावना व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम आहे. भाषा ही प्रत्येकाची स्वतःची स्वतंत्र असते. व्यक्ती बदलली की भाषेमध्ये फरक जाणवतो, प्रत्येक व्यक्ती आपले विचार भाषेच्या माध्यमातून इतरांसमोर व्यक्त करते. या भावना जास्तीत जास्त परिणामकारक पद्धतीने दुसऱ्यांच्या मनावरती बिंबविण्यासाठी भाषेत थोडाफार बदल करून अथवा इतर घटकांचा वापर भाषेमध्ये करून शद्बबद्ध केल्या जातात. मोहन पाटील यांनीही साखरफेरामध्ये याच पद्धतीने लेखन करून साखरफेरामधील कथानकाला गतिमानता मिळून पात्र परिचय करून देणे, वातावरण, निसर्गवर्णन इत्यादी घटकांचे वर्णन अतिशय सुंदर पद्धतीने, साध्या, सोप्या भाषेत करण्याचा प्रयत्न केला आहे.

साखरफेरामधील भाषाशैली, पात्रे, प्रसंग, वातावरण याला शोभेल अशीच आहे. कोठेही भाषेला ओढून-ताणून बसविण्याचा अतिरेक झाला नाही. लेखकांनी निवेदनासाठी प्रमाणभाषा व संवादासाठी ग्रामीण भाषेचा उपयोग केला आहे. तसेच कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील बोलीभाषेचा प्रभाव जाणवतो.

कादंबरीत ग्रामीण पात्रे बोलतात तेव्हा सर्वत्र रोखठोकपणा जाणवतो. कादंबरीत मोजकी पात्रे (तानाजी शेटे, झोंबडे पाटील इ.) सोडली तर इतर सर्व पात्रे ग्रामीण बोलीभाषेचाच वापर करतात. कादंबरीतील प्रतिमा ग्रामीण वातावरण जीवंत करणाऱ्या आहेत. त्यात विलक्षण उत्स्फूर्तता, सडेतोडपणा, उत्साह जाणवतो, मोहन पाटील यांची साधी, सरळ, सोपी भाषा,

व्यवस्थित मांडणी, निवेदन कौशल्य यामुळे ती वाचकांच्या मनाचा वेध होते. भाषेमध्ये म्हणी, वाक्यप्रचार, हिंदी, इंग्रजी शद्बांचा वापर समर्पकपणे केला असल्यामुळे ती उठावदार होते. तसेच कादंबरीच्या गुणवैशिष्ट्यांमध्ये भर घालते. प्रत्येक व्यक्तिरेखांच्या संस्काराप्रमाणे त्यांची भाषा आणी तोंडी असलेले शद्ब यांचा वापरही अतिशय योग्यपणे केला आहे. त्यामुळे पात्रांचे बोलणे प्रत्येकाला शोभेल असे आहे. या सर्व गोष्टी कादंबरीची गुणवैशिष्ट्ये वाढविण्याचा प्रयत्न करतात. ग्रानीण शेतकरी समाजातील दुःख, दारिद्रय, ऊस शेतकऱ्यांच्या समस्या, व्यथा, शेतकऱ्यांचे लाचार अपमानित जगणे, सहकारातील भ्रष्टाचार, साखर सम्राटांची मक्तेदारी यांचे अतिशय वास्तवपद्धतीने चित्रण करून ते सहजपणे साखरफेरामध्ये मांडले आहे.

उदा.

''आयला ह्या पुढारी वळूस्नी निवडून बी आमीच द्याचं आणि त्येंच्या नावानं बोंबलतबी आमीच बसायचं. त्येंचं कायबी वाकड होत न्हाई. आयला, ह्या खोक्याचं कर्ज आजूनबी फिटना झालंय पॉट कसं भरायचं? कर्ज कशातनं फेडायची? सांगा की, दोन रूपयची दाढी पाच रूपये झाली तरीबी काय मेळ बसंना गिऱ्हाईक तर बगतूसच कशी कशी असत्यात ती–''[१९]

या वाक्यातून अस्सल ग्रामीण बोली भाषेचा वापर जाणवतो. तसेच शिव्यांचा वापर कोणालाही न घाबरता स्पष्टपणे बोलणे, त्यांच्या जीवनातील दारिद्रय, पुढारी लोकांच्या विषयी चीड, महागाई इत्यादीविषयी उपहास व्यक्त होताना दिसतो.

''ऊस चांगला ज्योतिबाच्या सासणकाठीइतका उंच. शेंड्यावर फेट्यासारखा मलमलचा तुरा. पानं हिरवीगार एक एक पान तलवारीच्या पात्यासारखं धारी''[२०] शेतकऱ्यांना ऊस म्हणजे देवाची काठीच आहे असे वाटते. तर मऊ मऊ तुरा, हिरवीगार तलवारीसारखी पाने असलेल्या ऊसाविषयी शेतकऱ्यांना नेहमीच आकर्षण होते. त्यामुळे विविध उपमा देऊन ऊसाचे स्थान तर वाढलेच आहे शिवाय भाषेतील लालित्य व माधुर्य ही वाढले आहे.

''भीक मागायला आमाला भीक लागलेली न्हायी. गांडीत माती जाईपातूर आमी राबतोय, तवा ऊस दिसतोय. तोडून जनावरांपुढं टाकूया. खरं एक कांड सुदीक गाळपाला द्यायचं न्हायी. बोला शेतकरी संघटनेचा विजय असो.''[२१] शेतकऱ्यांनी ऊस दराविषयी आंदोलन जाहीर केले होते.

त्यामुळे वेळोवेळी शेतकरी अशा शिरा ताणून मुठी उगारून घोषणा देत होते. घोषणांच्या गजरामुळे लोकांच्यात जोम येत होता. तसेच आंदोलनाच्या काळातील शेतकरी संघटनेतील नेत्यांनी दिलेल्या भाषणाने भाषेचे सौंदर्य तर वाढतच होते शिवाय त्यात परखडता, कठोरता व शद्बांना धार येऊन रोखठोकतेचा साज चढलेला दिसतो. भाषणातील तीव्रतेच्या शद्बांनी लोकांच्या शरीरात वेगळीच स्फूर्ती निर्माण होऊन पिंपळाची पाने फडफडावीत तशा टाळ्या वाजत होत्या.

''अहो, रिकामं पोतं कोण खातंय. रस्त्यावरनं गाढवसुद्धा गोणपाट आता खात नाही. कारण त्याला सुद्धा माहित आहे की, हे बारदान कारखान्याच्या चेअरमननं आधीच चघळून उष्टं केलंय–''[२२] यासारख्या वाक्यामुळे आंदोलनातील तापलेल्या वातावरणात ओलावा निर्माण होऊन हास्याचे कारंजे उडायचे त्यामुळे वातावरण थोडे आनंदी व्हायचे. तीव्रता कमी व्हायची.

''मित्रांनो! मी तुम्हा सर्वांचेच आभार मानतो. तुम्हांला शुभेच्छा देतो. कारखान्याचा एक प्रमुख या नात्याने मी तुम्हांला आश्वासन देतो की, या कारखान्यात बागेत काम करणाऱ्या माळ्यापासून ते एम्. डी. पर्यंत सगळा स्टाफ आपल्या पाठीशी आहे. लागेल ती मदत घ्या आपल्या कार्यक्षेत्रात जावा. प्रत्येक शेतकऱ्याला भेटा. पटवून सांगत शेवटी काही ठिकाणी वेगळाच अनुभव आला तर तुम्हांला सुचेल ते करा. पण ऊस आणा''[२३] या ठिकाणी लेखकांनी झोंबडे पाटील यांच्या तोंडी प्रमाणभाषेचा वापर केलेला आहे. संघटनेच्या नेत्यांच्या भाषणात तीव्रता, विद्रोह, वेदना जाणवतात त्या कारखाना प्रशासनाच्या भाषणात जाणवत नाहीत. प्रमाण भाषेमुळे त्यांचे भाषण मिळमिळीत वाटते. औपचारिक वाटते.

मोहन पाटील यांनी साखरफेरामध्ये ग्रामीण प्रमाण भाषेचा वैविध्यपूर्ण वापर करून, कादंबरीची परिणामकारकता वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच लालित्य, माधुर्य, कारूण्य, उपहास इत्यादी गोष्टींमुळे भाषेला सरसता आली आहे.

**लोपचिन्हांचा वापर :–**

मोहन पाटील यांनी कादंबरी लेखनात लोपचिन्हांचा वापर केला आहे. कादंबरीतील व्यक्तिरेखां मनात दबलेल्या इच्छा, आनंद, दुःख, राग, द्वेष, मत्सर इत्यादी भावना

प्रत्येकवेळी शद्बरूपात प्रकट करू शकत नाहीत म्हणून लोपचिन्हांचा वापर केलेला दिसतो.

''आपून संगसंग पिवूया आज.... मला-मला-एकट्याला...च्... ही सारी बाटली पाजून हितं... छपरात निजीवता काय?''[२४] जयसिंग अण्णांना दारू जास्त झाली होती त्यामुळे त्यांना बोलता येत नव्हते. त्यात आणि इतरांनी ग्लास धूवुन ठेवले होते त्यांच्या मते अख्खी बाटली अण्णांनाच दारू पाजणार आहे म्हणून अण्णा चिडले होते त्यासाठी लोप चिन्हांचा वापर केला आहे.

''साकार... साकार... वाईच तोंडात घाला...'' म्हातारा आत ओढलेल्या आवाजात बोलला. पुन्हा डोळे मिटून गप् झाला.[२५] लिंगाप्पा डंगरे नावाचा म्हातारा ऊस योजनेचे पैसे न्यायला आला होता. त्याला मधुमेहाचा आजार होता. रांगेत उभे राहिल्यामुळे तो चक्कर येऊन पडला त्यामुळे त्याची बोबडी वळली म्हणून लोपचिन्हांचा वापर केला आहे.

''ही वार्ता म्हणजे समुद्रभर पेटलेल्या वडवानलावर मारलेला पाण्याचा सपकारा होता... पण... त्या शितोंड्याने चमत्कार केला''[२६] शेतकरी संघटनेमुळे वातावरण एकदम तापले होते. सरकारने ऊसाला वाढीव दर जाहीर केल्यामुळे वातावरण एकदम थंड झाले. या आनंदाच्या भरात त्यांना काही सुचत नव्हते. अशाप्रकारे लोपचिन्हांचा वापर केलेला दिसतो.

**उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर :-**

उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर उत्कंट भावना व्यक्त करताना त्या दाखविणाऱ्या शद्बांच्या शेवटी केला जातो. उदा. अरे रे... शाबास, वा, अरेच्या, म्हणजे आनंद, दुःख, आश्चर्य, तिरस्कार इत्यादी भावना व्यक्त करताना या चिन्हांचा वापर केला जातो.

उदा.

''किशानं पेवात पाहिलं. तसं त्याचे डोळे दिपून गेले. पेव साखरनंच काठोकाठ भरलेलं. किती रूंद!''[२७] किशाला स्वप्नात पांढऱ्या शुभ्र साखरेने भरलेले भले मोठे पेव बघून आश्चर्य वाटले.

''उद्यापासून सुरू होणाऱ्या ऊसक्षेत्र विकास योजनेचा लाभ घेणारा पहिला लाभार्थी शेतकरी असेल, आपला हा-किसन बापू खोत-!''[२८] सर्वांना किशाविषयी अभिमान वाटतो तसेच योजनेचा लाभ सर्वानाच मिळणार असतो म्हणून आनंदही होतो.

''येत्या आमुशापर्यंत दम काढला पाहिजे. मग गाडी सुराला लागणार! तिथनं पुढं घडी

बसणार!''[२९] किशाला कुडमुड्या जोशीनं नवे आशेचे किरण दाखवले होते. त्यामुळे तो उत्साही होता.

''कुठं ठेवतूस? घाल माज्या टाळक्यात! आयला कामं करत्यात...!''[३०] अण्णा आधीच भरमूने हाराचा गुंता केल्यामुळे चिडले होते. त्यात आणी नारळ फोडण्यासाठी दगड कुठे ठेऊ हे विचारल्यामुळे ते खूप चिडले. यातून अण्णांचा भरमू विषयीचा राग व्यक्त होतो.

मोहन पाटील यांनी अशा पद्धतीने उद्‌गारवाचक चिन्हांचा वापर केला आहे. या चिन्हांचा वापर त्यांनी अल्प प्रमाणात केलेला आहे.

**प्रश्नार्थक शैली :-**

मोहन पाटील यांनी कादंबरीमध्ये प्रश्नार्थक शैलीचा वापर करून कथानकामध्ये प्रश्नांची गुढता वाढवली आहे. त्यामुळे कथानकाला गती मिळते व प्रश्नांचा उलगडा होत जातो.

उदा. ''करणार काय? नव्यानं लावण करायची तर खर्चाची बाब. बरं, तो ऊस बारा-तेरा महिने सांभाळायचा. ऊस फॅक्टरीला गेल्यावर हातात. पैसा येणार. त्यो कधी? तर चांगलं दीड वर्षानं. आणी तो पैसाही बँकेकडं मग हातात काय शिल्लक? गुळखोबरंच की! पुन्हा पुढच्या वर्षी खोडव्याला लागवड, मशागत, त्येची पाणीपट्टी ती कशातनं भागवायची?''[३१] नवीन लावण करण्यासाठी तसेच वर्षभर खर्चासाठी पैसे कोठून आणायचे या प्रश्नाने किशा हतबल झालेला दिसतो.

'का? काय झालंय? तुमाला याड लागलंय.'

'कोण म्हंतोय? म्हणाय कशाला पायजे'[३२] बायजाने किशाला हा जाणीवपूर्वक प्रश्न विचारला आहे. कारण ती चिडली होती. दिवसरात्र कष्ट करणारा किशा विचित्र वागू लागला होता. कारण तो रात्रीचा झोपेत बडबडत असतो.

''सोसायटीचं पाणी मिळतंय म्हटल्यावर हुं... म्हणून पाजायचं. तेच्या आयला पाणी का नोटा छापल्यागत छापाय येतंय व्हय? का ते कुठं पिकतंय. आमास्नी आकला कवा याच्या? हे बगा की वाटंवर किती पाणी साठलंया. आता ह्यातनं माणसानं कसं जायाचं? पाजणाऱ्याला काय भानपन? मी म्हंतो, पाण्यासंगं मस्ती किती करायची? कोण कुणाला सांगणार?''[३३]

दिवसेंदिवस पाण्याची टंचाई निर्माण होत आहे. ज्याना पाणी नाही ते पाणी पाणी करताहेत. आणि ज्याना पाणी आहे त्यांना पाण्याची किंमत नाही. इथे पाण्याचा अपव्यय पाहून पाणी नियोजनासंबंधी अनेक प्रश्न निर्माण झालेले दिसतात.

अशाप्रकारे मोहन पाटील यांनी प्रश्नार्थक शैलीचा वापर केला आहे. हा वापर त्यांनी जाणीवपूर्वक न करता सहजासहजी केलेला आहे. प्रश्नार्थक शैलीचा वापर त्यांनी वारंवार करून जागोजागी प्रश्न निर्माण केले आहेत.

**इंग्रजी शद्व :-**

कादंबरीमध्ये बऱ्याच ठिकाणी इंग्रजी शद्वांचा वापर केलेला दिसतो. इंग्रजी शद्व कादंबरीमध्ये लेखकाने आवर्जुन वापरलेले नाहीत. तर कथानकाची मांडणी करताना ते सहजपणे आलेले आहेत.

उदा. रेस, रजिस्टर, मीटिंग, हॉल, केबीन, फोमच्या खुर्च्या, नील, सनमाईक, फॅक्टरी, जनरल, फायनल, कॉर्नरसभा, फ्रंट पेज, बफर्स, स्टॉक, मेटेनन्स, स्टेशनरी, टन, बिग–बुल, साईट, ॲम्बॅसिडर व्हॅन, बॅनर, स्लीप बॉय, प्लेट, ऑर्डर, सेक्रेटरी, पब्लिक, टनेज, फोटोग्राफर, चेक, फॉर्म, सिमेंट कॉंक्रिट, टेन्शन, ट्युबलाईट, स्क्रू, टाईट, इस्टेट, ग्लास, कौंटर, विड्रालस्लीप, क्लार्क, टोकन, डायरेक्ट, बफर्स स्टॉक, डायबेटिस, ऑप्रेशन, रॅक, बल्ब, थर्टी, अँटीना, प्लॉट, स्टाईल, बिसलरी, कॉर्नर, ड्यूटी, हॉर्न, ॲक्सिलेटर, स्टार्ट इत्यादी इंग्रजी शद्वांच्या वापराने वाक्यात उठावदारपणा येतो.

**हिंदी शद्व :-**

मराठी, इंग्रजी शद्वांच्या मानाने अगदि अल्पप्रमाणात हिंदी शद्वांचा वापर केलेला आहे.

उदा. दिल जमाई, ऊस भला तर जग भला, किस झाडकी पत्ती, पैसा फेको और आरसा देखो.

**नादानुकारी शद्व :-**

नादानुकारी शद्वांचा प्रत्यय कादंबरीमध्ये दिसून येतो. तसेच हे शद्व त्या-त्या पात्रांशी एकरूप होताना दिसतात.

उदा. खुटपुट, तुणतुणं, खटपट, खणखणीत, अडीनडी, रेटारेटी, पटापट, भिरभिरत, फेकाफेकी, मोडतोड, आपटाआपट, फटाफट, दणादण, पळापळ, लगालगा, गरागरा, हळूहळू, मानपान, रूटुखुटं, गरगर, घडाघडा, खदाखदा, ठाकठीक, मिठाई-बिठाई, ढांगढिंग, गुपल्यागुपल्यानं, गुंतागुंत, कुजबूज, कलकलाट, कळकळीने, तणतण, धडाधडा, लुकलुक, कुरकुर, खुल्लमखुल्ला, लुटूलुटू, खांडखांडावर, पटपट, टण्टण्, झण्झण्, वटवट, तुटूकफुटूक.

**शिव्यांचा वापर :-**

साखरफेरामध्ये ग्रामीण भाषा असल्यामुळे साहजिकच त्यांच्या बोलीभाषेतुन शिव्यांचा वापर झालेला दिसतो.

उदा. वळू, बोंबलणे, आयला, उंडगमल्लीच्यानू.

**म्हणी व वाक्प्रचार :-**

मोहन पाटील यांनी कादंबरीमध्ये समर्पक अशा म्हणींचा वापर केला आहे. म्हणी म्हणजे अनुभवांच्या खाणीच असतात. म्हणीमुळे भाषा सुंदर व प्रभावी होते. भाषेला आकर्षणपणा प्राप्त होतो. कादंबरीमध्ये लेखकांनी म्हणीची पखरण केली आहे.

उदा. एका लुगड्यानं बाई म्हातारी हुतीया काय, झॅट मे झिंगा, मुंगीला मुताचा पुर, आडला हरी गाढवाच पाय धरी, म्हाताऱ्या गांडीला लुगड्याच भ्या कशाला, आधीच फाटलंय त्यात जास्तीच पाय घालतूस, आत एक बाहेर एक, पदरचे खाऊन गावचे धुणं धुणे, औचित उठणे आणि चोत्यात मुतणे, ज्याचा दाणा त्यालाच मिळणार, हत्तीचा उडाळपणा कोण काढतोय इत्यादी म्हणींचा वापर केलेला दिसून येतो. ग्रामीण भागातील लकबी, उच्चारपद्धती, संस्कृती इत्यादी बरोबरच प्रभावी अर्थ व्यक्त करण्यासाठी म्हणींचा वापर केलेला दिसून येतो. तसेच कादंबरीचा आशय समृद्ध होतो.

**वाक्प्रचार :-**

मोहन पाटील यांनी कादंबरीमध्ये म्हणींच्या बरोबर वाक्प्रचारांचाही वापर केला आहे ते पात्रांच्या तोडून नकळतपणे बोलले जातात.

उदा. पोटात बिब्बं भरणे, गळ्याला फास लावणे, ऊसाच्या नावानं अंघोळ करणे, कंडका पाडणे, बोऱ्या वाजणे, दुवा मिळणे, छबी तयार होणे, पारा चढणे, सुफडा साफ होणे, तमाशा बघणे, सैरावैरा धावणे, डोके सुन्न होणे, चेटुक करणे, उल्हासी येणे, अंग शहारणे, हर्षाचा गोळा उठणे, मनात ईर्षा पेटणे, मनात उकळ्या फुटणे, डोक्याची शीर उठणे, गुंगी चढणे, बुडाखाली अंधार असणे, अक्कल घाण टाकणे, सुताने स्वर्ग गाठणे, दरोडा पडणे, इस्तु घालणे, रंगाचा भंग करणे, दैव बलवत्तर असणे, बाची बाभुळ बुडणे, गावाचं धुण धुणे, नावाने अंघोळ करणे इ.

म्हणी व वाक्प्रचार परस्परांशी निगडीत असल्यामुळे ते खुपच जुने व अधिक अर्थ व्यक्त करणारे दिसतात. म्हणी व वाक्प्रचारामुळे भाषेचे सौंदर्य वाढविण्यास मदत होते. व्यक्तिरेखांच्या तोंडी येणारे म्हणी व वाक्यप्रचारामध्ये ठसका आहे आणी पिढ्यान्‌पिढ्याच शहाणपण त्यात गोठलेलं आहे. असे आपल्याला जाणवते.

**अलंकार, उपमा :-**

मोहन पाटील यांनी 'साखरफेरा'मध्ये म्हणी व वाक्यप्रचारांबरोबर अलंकार व उपमा यांचाही वापर अतिशय समर्पक करून भाषेला सुंदरतेचा साज चढवलेला दिसतो.

उदा.

''गोठ्यात हत्तीच्या पिल्लागत तीन जर्सी गाई''[३४]

''गोठ्यावरचा पत्रा गंजून शेवयाच्या ताटासारखा जाळीदार झालेला ''[३५]

''कानात वारे शिरलेल्या वासरागत त्याची अवस्था झाली''[३६]

''जरा चांगला साबण चोळून आक्षी वांग्यागत गुळगुळीत कर बघ दाढी''[३७]

''अंधारात मनात हिरवेगार विचार यायचे''[३८]

''बाईच्या कपाळाला कुंकू नसलं की ती जशी भंगाळ दिसती तसं रानात ऊस नसला की तेबी भुंड दिसतया. ऊसाशिवाय चैन पडत न्हायी. खर का खोटं म्हतासा''[३९]



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

यासारखी आशयगर्भ वाक्यांनी भाषेची परिणामकता वाढून ग्रामीण भाषेतील ठसका दिसून आला आहे.

''आणी आता त्याच इमारतीत महात्मा कारखान्याचा संपूर्ण प्राण गुदमरला होता. तेच कारखान्याचे हृदय होते. तिथेच मेंदू होता. तिथेच कारखान्याच्या जीवनमरणाची धडपड सुरू होती. तिथले सारे ठोके व्यवस्थित पडले तरच कारखान्याचे धड शाबूत राहणार होतं.''[४०]

कारखान्याचा बॉयलर पेटला होता पण ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आंदोलन केल्यामुळे कारखाना बंद होता. तो चालू होण्यासाठी मीटिंग हॉलमध्ये चर्चा चालली होती. ती जर व्यवस्थित झाली तर कारखाना चालू होणार होता. ही गोष्ट सांगण्यासाठी लेखकांनी वापरलेली भाषा, वाक्ये, मनाला विचार करायला लावतात. तसेच मीटिंग हॉलमधल्या वेगवेगळ्या गोष्टींना दिलेली शरीराच्या विविध इंद्रियांच्या उपमा अतिशय समर्पक आहेत.

शेती हा देशाचा कणा आहे. आणी या कण्याचा आधार शेतकरी आहे. पण गेल्या कित्येक वर्षात केवळ राजकीय षडयंत्र म्हणून स्वार्थासाठी खुर्चीसाठी प्रत्येक सरकानं या देशातील शेतकऱ्याला संपवायचा घाट घातला आहे. पण तुम्हाला सांगतो मित्रांनो हा कणा पोलादी आहे. राजकीय हेतूनं हा मोडावयाचा ठरवला तर त्यांचच कंबरडं मोडल्याशिवाय राहणार नाही.[४१]

इथे आपल्याला शेतकरी बांधवांच्या मनातील तीव्रता जाणवते. इतक्या वर्ष सहन केलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांची प्रतिक्रिया स्पष्ट दिसते.

**काव्यात्मकता :-**

मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' मध्ये काव्यात्मकतेचा वापर अल्पप्रमाणात केला असला तरी तो योग्य ठिकाणी केल्यामुळे त्या प्रसंगाला उठावदारपणा येऊन त्यांचे महत्त्व लक्षात येते. शेतकरी शेतीची कामे करत असताना कृषि विषयक गीते म्हणत असतात. त्यामुळे त्यांच्या काम करण्यास उत्साह, जोम, निर्माण होऊन आनंदाने काम पूर्ण होत असते. कष्टाचा सर्व कंटाळा निघून जात असे. त्यासाठी कृषि विषयक गीते म्हटली जात असतात. 'साखरफेरा'मध्येही किशाची लावण करायची चालली होती. बरेच जण लावण करायला जमले होते. तेव्हा दुंडा

शामाला म्हणाला व्हवण हुंदे की एक. सर्वांनी प्रोत्साहन देऊन शामाला संगीत लावण म्हणायला सांगितली तसे सर्वांच्या कामाला गती येऊन प्रत्येकजण ''माज्या... रामा वो... दाजी. वो... दाजी अशी साथ देत होते.''

''बारा बसुती कारू नारू

गावात गोंधळ किती किती

ऐका सांगतोय शामा तुमाला

लाख आपती त्येच्या किती... रं...रं...रं...रं

हे... हे... हे... रामा वो... दाजी

बामण मोठा चतुर गोटा

तुपभाताला पालथा पडी

गाठ पायानं मारून शाणी

हासून सारं गोड करी

हे... हे... हे... वो... रामा वो...दाजी

हे रामा वो... दाजी... रामा वो .... दाजी....

हे ताठ मराठा छाट जुमानी

पर संबळून न्हेतोय साऱ्यास्नी

जातीसाठी खाईल माती

वळंत वाती शाण्णवकुळी... रं .... रं ... रं..

हे रामा वो... दाजी... रामा वो .... दाजी..... [४२]

तसेच ''हे पयला नंबर कुणाचा... खंडराव माजा गुणाचा... खंडराव माजा गुणाचा... स्वभाव तेचा शेणाचा''[४३] गावातील प्रकरण, भानगडी, लबाड्या, काही माणसांची वागण्याची वेगळी तऱ्हा यासर्व गोष्टींचा मेळ बसून तो कवने रचत असे. अशाप्रकारे सोनार, शिंपी इ. बारा बलुत्यांच्या जीवनाचे वर्णन करून शामाने कवने रचली होती. आणि अतिशय बहारदार रीतीने ती सादर केलीत. तसेच काही कवनाना त्याने चित्रपटातील गाण्याच्या चाली लावलेल्या आहेत.

त्याचप्रमाणे कादंबरीमध्ये शेतकरी संघटना उभारली होती त्या संघटनेच्या वतीने जी घोषणांची आतषबाजी केली जात होती ती ही काव्यात्मक पद्धतीने करून त्या तीव्र वातावरणाला सौम्यता प्राप्त होत होती. कादंबरीमध्ये या पात्रांची भाषा ग्रामीण असल्यामुळे गाणी, काव्यमय घोषणा ही ग्रामीण बोली भाषेतच साकार झालेल्या दिसतात.

कोण म्हंतंय देत न्हायी...

घेतल्याशिवाय ऱ्हात न्हायी...[४४]

या सारख्या घोषणांनी सभा मंडप हादरून जात असे. शामाने दारू पिली होती त्यामुळे त्याला काही सुचत नव्हते. त्याचे डोके सुन्न झाले होते. तेव्हा किशाने, शामाने, जयसिंग अण्णांची व नर्सबाईची बातमी सांगितल्यावर दारूच्या नादातही शामाने त्यांच्यावरती कवन रचले होते.

आरं ह्या ऊसाची तऱ्हा लई न्यारी रं...

जयसिंग अण्णांची... नरसबाई प्यारी...[४५]

दारूच्या नशेत जयसिंग अण्णांची आतल्या गोटातली बातमी कळाल्यावर शामाच्या डोक्यात वेगळीच चक्र फिरू लागली.

**विनोदाचे स्वरूप :-**

मोहन पाटील यांनी कादंबरीमध्ये नर्म विनोदाचा शिडकावा करून हास्याची कारंजी उभी केली आहेत. त्यांनी अल्पप्रमाणात विनोदाचा वापर केला आहे.

''अहो ही खरोखरच सुखद गोष्ट आहे. जवा सुखद गोष्ट घडती तवा मिठाईबिठाई वाटत्यात. टी.व्ही. वर दावलं नव्हतं का मागं एकडाव. ती कोण ती उत्तर प्रदेशाची मायावती. तिच्या तोंडात आडवाणी मिठाईचा तुकडा घालत नव्हतं काय? त्येंची दिलजमाई झालती. सुखद गोष्ट ती. तसं आज तुमची नि तुका मेंबरांची दिलजमाई झाल्याली हाय. ही सुखद गोष्ट मग नगो का तुमचं त्वाँड गॉड कराय– शामा डोळा मारत बोलला.''[४६] या सारख्या वाक्यातून पुढारी नेत्यांच्यात राजकारणातुन घटनांऱ्या घटनांविषयी उपहास निर्माण केला आहे. तसेच स्वतःच्या फायद्यासाठी नेते मंडळी पाहिजे तेव्हा शत्रूत्व विसरून एक होतात. तर पाहिजे तेव्हा शत्रूत्व धारण करतात.

''तर आज या ठिकाणी ऊस क्षेत्र विकास योजना ही या ठिकाणी शेतकऱ्यांच्या फायद्याची आहे'' हॉलमध्ये माणसांच्या शेवटी भिंतीला पाठ लावून बसलेला शामा हळूच म्हणाला, शेतकऱ्यांच्या का तुमच्या फायद्याची?[४७] या वाक्यातून सर्वजण हसू लागले. कारण सरकारकडून ज्या योजना शेतकऱ्यांसाठी येतात त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचेपर्यंत पुढारी अधिकारीच त्यांना संपवून टाकतात. रूपयातील दहा पैसे कसे तरी शेतकऱ्यांपर्यंत पोहचतात म्हणूनच या वाक्यांमध्ये विनोद जाणवतो.

शामानं भरमूला ग्लास देताच त्यानं उभ्या उभ्या तो तोंडाला लावला नि एका रप्पाट्यात सगळा ग्लास रिकामा केला. तसं शामा म्हणाला- 'पाणी पेल्यागत दारू पेलास! काय जनावर-बिनावर हायीस का काय?'' जनावर बरे अस्ते. शामराव पाणी पेताना ते एकदा-दोनदा तरी तोंड काढते. भरमू ही औलाद जनावरापलीकडची आहे. माणसातले ते एक जनावर आहे.' असं बोलून अण्णा खँ... खँ... खुक् खुक् करत एकटेच हसत राहिले.[४८] या वाऱ्यातून मादक पदार्थांच्या सेवनाने माणसाचे जनावरात कसे रूपांतर होते व त्यावरती लोक कसे हसतात. याविषयी विनोद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

''हत्तीच्या उडाळपणा कोण काढतय काय मेलेल्या आईचं दूध पेलय व्हय आमी'' यासारखी वाक्ये हृदयाला भिडतात. अशाप्रकारे उद्‌गारवाचक चिन्ह, प्रश्नार्थक शैली, लोपचिन्हांचा वापर करून भाषेची परिणामकारकता वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इंग्रजी, हिंदी, मराठी अशा शद्बांच्या वापराने वाक्यामध्ये आयशगर्भता आली आहे. म्हणी, वाक्यप्रचार, उपमा काव्यात्मकता यांच्या वापरामुळे भाषासौंदर्य वेधक झाले आहे. मनाचा अंत पाहणारे विविध प्रसंग, साधी सरळ माणसे, विविध दृष्ट प्रवृत्तींचा त्यांना करावा लागणारा प्रतिकार, जीवनातील समस्या, या गोष्टींचे चित्रण ग्रामीण बोली, भाषाशैलीचा वापर केल्यामुळे या कादंबरीला ग्रामीणतेचे एक मूल्य प्राप्त झालेले आहे. साखरफेरातील ही भाषा बोलणारी पात्रे रूपगुणासह उभी राहताना दिसतात. हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे.

**प्रतिकांचा वापर :-**

शेतीमध्ये उंदरांना पिकाचा शत्रू मानले जाते. कारण उंदीर पिके कुरतडतात, फस्त करतात, जमिनीत बिळे पाडतात. त्यामुळे पिकांचे नुकसान होते. शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये एका पाठीमागे एक अशा अनेक समस्या येत असतात. त्यातीलच एक समस्या म्हणजे हे उंदीर होत. कारण इतरांप्रमाणे शेतकऱ्यांना देशोधडीला लावण्यात यांचाही हातभार असतो. शेतकऱ्यांचे शत्रू असणारे हे उंदीर 'साखरफेरा' मध्ये किशा नावाच्या शेतकऱ्याला त्रास देताना दिसतात. किशाच्या स्वप्नातील उंदीर हे पांढऱ्या रंगाचे होते. पांढरा रंग हा साखरेचा असतो आणि ही साखर ऊसापासून तयार होते. या ऊस पिकावरती कादंबरीचे कथानक अवलंबून आहे. तसेच किशालाही पैसे कमविण्यासाठी या नगदी पिकाची आवड असते. परंतु आर्थिक, राजकिय, भ्रष्टाचार इत्यादी समस्यांमुळे तो ते घेऊ शकत नाही. आणि या सर्व गोष्टींवरती मात करून त्याने हे पीक घेतले तर दैवाने परीक्षा बघितली. जोतिबाच्या सासणकाठी एवढा उंच आलेला ऊस धडाधडा पेटून राख झाला. या सर्व समस्यांनी, विचारांनी किशाचे डोके जड झाले आहे. किशाच्या मनातील या विचारांना कुरतडण्याचे काम हे पांढरे उंदीर करीत आहेत. साखरेचे प्रतिक म्हणून पांढऱ्या उंदराचा वापर केलेला दिसतो.

**संवाद :-**

'साखरफेरा' ही कादंबरी बोरीगाव, लाटेवाडी या दोन गावाच्या परिसरावर आधारीत लिहलेली आहे. या दोन गावा व्यतिरिक्त पाडळी, मनवाड, शापूर, चिंचली, लाटेवाडी, पाचवा मैल इत्यादी गावाची पार्श्वभूमी आलेली आहे. या कादंबरीतील ग्रामीण भागातील पात्रे ग्रामीण भाषेचा वापर करताना दिसतात. कादंबरीतील भाषा रोखठोक, सडेतोड, हृदयाला भिडणारी, खटकेबाज आहे. संवादामुळे कादंबरीला जीवंतपणा येतो. जितके संवाद अचूक वेधक असतात तितकी कादंबरीला गती मिळते व कथानक वेगाने पुढे सरकते. संवादामधून कादंबरीतील पात्रांची ओळख होते. या कादंबरीतील कथानकामध्ये निवेदनाबरोबर संवादालाही महत्व असते. अनेक धर्माची, जातीची पात्रे या कादंबरीत आहेत. लेखक अशी पात्रे त्यांच्या बुद्धीप्रवृत्ती संवादामधून सहजपणे व्यक्त करतो.

किशाचा ऊस जळल्यामुळे त्याचे मन दुःखी होते. ऊसाच्या पिकावरून त्याचे मन उडाले होते. काय करावे, त्याला काहीच सुचत नव्हते. त्याची नाराजी पाहून गणपा म्हणाला.

'छः छाः ऊसावरच मन काढू नका. आताच्याला ऊसाशिवाय पैसा कशाचा हातात येतोय.'

आता ऊसात तर काय न्हायलंय. ऊसाचं भूस झालंय समदं.

सारी देणी भागवून हातात काय न्हातयं?

कारखाना तर ऊसाला दर कुठं देतोय बोंबलायला?

वाईच कळ काढा. पुढं पुढं ऊसाला दर हाय.

औंदा न्हाई, अड्यालसाली न्हायी, त्येच्या अड्यालसाली

नाही, तर फुढंलाच दर कसा मिळणार? आत्ताच कारखानं सारं डबघाईला आल्यात कर्जात बुडल्यात.

साऱ्या गप्पा हाईत वाढीव दराच्या गप बस उगं.

कारखाना कर्जात हाय म्हंत्यात ते सार राजकारण हाय.

नाटक हाईत हेंची. मग संचालकांच्या चेअरमनच्या गाड्या कशा पळत्यात?

त्येला कुठन पैसे आणत्यात? वाईस थांबा, हेंची सगळी नाटक बंद हुत्यात. लई उशीर न्हायी, म्होरल्या सालीच बघा ऊसाच्या दराच.[४१]

ह्या संवादामधुन किशाचे ऊस पिकाविषयी झालेले वाईट मत आणि कारखान्याचा भ्रष्टाचारी कारभार त्यामुळे कारखाना कर्जबाजारी झाला व गरीब शेतकरी जनतेला ऊसाचा पुरेपुर मोबदला मिळू शकला नाही. असे मत व्यक्त होते.

जयसिंगअण्णांना बोरीगावातील सोसायटी चालवायचा कंटाळा आला होता. धान्य, रॉकेल दुकान बंद पडली फक्त पाणी व खत दुकाने चालू होती ह्या दोन्हीत अण्णांना हवा तेवढा भ्रष्टाचार करता येत नव्हता. गावकरी म्हणत अण्णांनी रॉकेल पिल आणि धान्य खावून संपवल त्यामूळे ही दुकाने बंद पडली. अण्णांना या सोसायटीच्या छोट्याशा डबक्यात न रहाता कारखान्याच मोठ्या समूहात जाण्याची ओढ लागली होती. शामा आणि जयसिंगअण्णा यांच्यातील संवादातून ह्या गोष्टींचा स्पष्ट उलगडा झालेला दिसतो.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

शामा तुका मेंबरच्या विश्वासातला होता. म्हणून मुद्दाम अण्णांनी पोटातला विषय शामासारख्या बारक्या माणसापुढे मांडला होता.

अण्णा माजं ऐकता का?

शद्वात शक्य तितकी कोवळीक आणत शामा म्हणाला तरी त्याचा बेरकीपणा अण्णांच्या लक्षात आल्यावाचून राहिला नाही.

सांग की--

मला वाटतं तुमी सोसायटी सोडू नये. हित गावात जी मजा हाय ती फॅक्टरीवर अजिबात न्हायी. फॅक्टरीत आता काय न्हायलंय? डबघाईला आल्या ती.

मग सोसायटीत तर काय राम न्हायलांय? डबघाईला आल्यात.

मग सोसायटीत तर काय राम न्हायलाय? पाक साऱ्याचा सुपडा साफ झालाय. धान्य दुकान, रॉकेल डेपो हुता मागच्या चेअरमननं त्या खाल्या आता ते बंद पडलं. हितं आता पाणी देत, खत, विकत, साऱ्या गावाच्या कागाळ्या ऐकत माशा मारत बसायचं. पदरचं खाऊन गावचं धुणं धुवायची पाळी आलीया. फॅक्टरी समुद्र हाय. आता संपली म्हटलं तरी तिथं लई ना थोडं हायच रे असं कसं म्हंतूस?[१०]

इथे आपल्याला अण्णांना असलेली खूर्चीची हाव स्पष्टपणे दिसते. त्यांनी गावातील सोसायटी तर बंद पाडलीच. आता तर त्यांचा डोळा कारखान्यावर होता. एकदा माणसाला बाहेरच्या पैशाची सवय लागली की ती त्याची ओढ वाढतच जाते. कितीही पैसा जवळ आला तरी त्याची हाव पूर्ण होत नाही. माणूस स्वतःच्या स्वार्थापोटी इतका भ्रष्टाचारी बनतो की त्याला आपल्या एकट्यासाठी सर्व गावाचा तोटा होतो आहे हे देखील लक्षात येत नाही.

पुढील संवादातून शेतकऱ्याच्या वाट्याला आलेल्या अठराविश्वे दारिद्र्याचा जीवनपटच समोर उलगडताना दिसतो. शामानं खूप दारू पिलेली होती. त्या नशेत तो आपल्या मनातील दुःख रडत-रडत आपल्या मित्रांना बोलून दाखवतो.

श्याम,...ऊठ. तुला दारू चढल्या.

न्हायी, न्हायी शामानं मुंडी हलवली.

मग कसलं स्वाँग काढलायस हे. रडाय काय झालं?

काय करू ते सांग मला.

का? काय झालय तुला?

पोरगी बाळंतपणाला आणून सोडल्या.

कोण?

जावायानं... सुक्काळीचा आपून निवांत गेलाय...

मग? तिचं कायं?

तिच दिवस भरल्यात... दवाखान्यात आडमीट कराय पायजे तिला.

बाळंतपण अवघड हाय तिंच.

मग?

पैसा कुठला आणू मी, धा हजाराच पर्करण केलं. त्यातल सा हजार दवाखान्याला जात्याल. शामानं डोळे पुसले तो खाकरला म्हणाला सा हजार दवाखान्याला गेल्यावर चार हजारात ऊसाची लावण कशी करू ते सांग मला.[११]

ह्या गोष्टीतून आपल्याला भांडवलाअभावी शेतीची पैशाअभावी प्रपंचाची झालेली शेतकऱ्यांची अगतिकता स्पष्ट होते. शेतकऱ्यांची सुखाची कल्पना किती साधी असते. पण तिचीही परिपूर्ती होऊ शकत नाही.

वर्षानुवर्ष शेतात ऊसाचे पीक घेतले. इतकी वर्ष झाली तरी ऊसाला म्हणावा असा दर नाही. कधी मिळालाच नाही. कधी कारखाना तोट्यात तर कधी परदेशातून साखर आयात, तर कधी कारखान्यातील राजकारण अशी अनेक कारणे सांगून दरवर्षी तीच ओरड. कारखाना दिल तोच दर घेवून दरवर्षी शेतकऱ्यांनी गप्प बसायचे. ह्या सर्व गोष्टींना कंटाळून शेतकऱ्यांनी आंदोलन उभारले. ऊसाला टनाला बाराशे रूपये दर मिळाला तरच ऊस कारखान्याला पाठवायचा नाही तर असाच वाळून द्यायचा. जनावराना घालायचा. अशा प्रसंगी शेतकऱ्यांचे हे संवाद हृदयाला पीळ पाडणारे होते.

शेतकरी म्हणजे झाडाचा पाला वाटला व्हय?

हळूहळू मरण्यापेक्षा एकदम मरू या!

आमाला मारून तुमी कसं जगता?

कारखान्याची चिमणी बंद पडायची ताकद हाय ह्या दंडात.

ज्यो ऊस तोंडल त्येला फडातच बुकलायचा.

व्हय नाद करायचा न्हायी.

आमच्या जीवावर गाड्या उडीवता व्हय?

आमचा प्रश्न आमी सोडवू.

आमच्या वर काय दर देऊन मेहेरबानी करत्याच?

हेंच्या खुर्चीलाच हात घालाय पायजे एकडाव.

एकडाव हिसका दावूयाच.[५२]

ह्या संवादातून अनेक मुखातून भडकलेल्या अग्निज्वाला बाहेर पडताना दिसत होत्या. त्या धगीन परिसर तापत होता. शेतकऱ्यांची आंदोलनाविषयीची मानसिकता तीव्र होवू लागली होती. प्राण पणाला लावून प्रत्येकजण पुढे होता. मागे सरकारयला कोणी तयार नव्हता.

मोहन पाटील यांनी साखरफेरामध्ये ग्रामीण बोली बरोबरच हिंदी, कानडी भाषेचा वापर वेळप्रसंगी केला आहे. व्यक्ती जर दुसऱ्या धर्मातील असेल किंवा वेगळ्या भागातील असेल तर त्यांची बोली भाषा वेगळी असणार म्हणून त्याच्यानुसार त्यांच्या बोलण्याची भाषा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

शामा दारू पिण्यासाठी ज्या दुकानात जातो त्या दुकानाबाहेर एक मुस्लिम म्हातारी खारीडाळ, शेंगदाणे, पापडी इ. खाद्यपदार्थ विकत बसत असे. शामा खारीडाळ विकत घेण्यासाठी गेल्यावर खातेम व शामा यांच्यातील संवाद हिंदी भाषेतुन शद्बबद्ध झाला आहे. शामा खातेमला म्हणतो,

'खातेम... तुजं दुकान बरं हाय बघ–'

'क्युंरे. आज क्यूं इतनी पूछताछ करता है।'

'वो... कैसा भला?'

'आज तू भी भौत अच्छी दिखती है।'

'च्यल मुड्या. घे ती डाळ. उठ हितनं माझ्या फुड्यातनं'[५३]

खातेम ही मुस्लिम धर्मातील असल्याने तिची भाषा हिंदी आहे हे स्पष्ट जाणवते पण ती हिंदी बरोबर मराठीही बोलताना दिसते. तसेच शामाही खातेम बरोबर हिंदीतच बोलताना दिसतो. या संवादातून शामाला आपल्या पेक्षा खातेमचा छोटासा व्यवसाय उत्तम वाटतो. कारण त्यातून रोजच्या रोज चार पैशाची मिळकत आहे. तसेच शामाचा विनोदी स्वभावही स्पष्ट होतो. खातेम मात्र मोजकेच बोलताना दिसते.

पाडळीच्या पलीकडे कर्नाटक रस्ता होता. कर्नाटकातूनही ऊस कारखान्याला येत होता. त्यामुळे तिळ्डचेही लोक आंदोलनात सहभागी झालेले त्यामुळे बोरीगावचे कार्यालय हे मुख्य असल्याने तिकडे लोकांची वर्दळ चाले. शामा हा शेतकरी संघटनेच्या बाजूने होता तर परिसा कारखान्याच्या बाजून त्या दोघांमध्ये जो संवाद झाला आहे तो कानडी भाषेतूनच झाला आहे.

'नी याक् इंद भानगड्यांगं बिदी?' (तू कशाला ह्या भानगडीत पडलास?)

बाळा डोळे कपाळात चढवत म्हणाला – 'याक् आंद्र? खबीगी दरा ब्यादू?' (का म्हणजे? ऊसाला दर नको?)

'नग बी दरा बेक नो..., खरे झगळतार औरं झगाडखोत खुंडली. दरा शिगत्र, औरगी वब्याग्य सिक्कू दिली?' (दर मला बी पायजेच की. खरं भांडत्यात ती भांडूद्यात. मिळाला दर तर त्यो त्यास्नी एकट्याला मिळणार आहे?)

'सुम् खुंड. भाळ शाण्यातना हेळब्याड. सुम होग'(गप. जास्ती शानपण सांगू नकोस. जा मुकाट्यानं) [५४]

शामा व परिसा यांच्यात ऊस दरावरून बोलण झाल. या बोलण्यातून परिसाची स्वार्थी वृत्ती दिसून येते. तर शामा संघटनेच्या बाजूने असल्यामुळे दंगा नको म्हणून शांत बसताना दिसतो.

अशाप्रकारे मोहन पाटील यांनी साखरफेरामध्ये जी पात्रे रंगविली आहेत ती ग्रामीण बोलीभाषेतील संवादामुळे जिवंत झाल्यासारखी वाटतात. या संवादामुळे मनातील भावभावना चटकन इतराना समजतात. कन्नड, हिंदी, मराठी भाषेचा वापर अगदी सहजतेने आवश्यक

तेथे व अल्पप्रमाणात केला आहे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांची व्यथा, भांडवला अभावी होणारी त्यांची फरपड, साखर प्रश्नाचा गुंता, भ्रष्टाचार, ऊसाला मिळणारा दर, शेतकऱ्यांची स्वप्ने, पाण्याचा दूरपयोग असे अनेक मुद्दे मोहन पाटील यांनी 'साखरफेरा' या कादंबरीतील संवादातून अत्यंत कळवळ्याने उपस्थित केलेले दिसतात.

**वातावरण व प्रसंगचित्रण :–**

कादंबरीमध्ये वातावरण निर्मिती हा महत्त्वाचा घटक मानला जातो. कादंबरीतील पात्रे लेखकाने निर्माण केलेल्या कल्पनेत वावरताना दिसतात. व्यक्तिचित्रणांच्या विविध वर्तनांना चालना देण्याचे त्यातून निरनिराळे प्रसंग निर्माण करण्याचे सामर्थ्य वातावरणामध्ये असते. व्यक्तिचित्रणांची निर्मिती विशिष्ट प्रदेशातून होत असते त्यामुळे त्या प्रदेशाचे वातावरण त्यातून निर्माण होणारे प्रसंग यांचे वर्णन कादंबरीमध्ये येत असे. कादंबरीला विशिष्ट प्रदेशाची पार्श्वभूमी असल्यामुळे तेथील वातावरण कादंबरीमध्ये शद्बबद्ध होत असते.

उदा.

''किशा फडाच्या राखुंड्यापुढं रंजीस होऊन बसला! अजून मलिकवाड रस्त्यावरची धूळ पायाला गरम चटके देतील, पण त्याला आता कशाचीच शुद्बबुद्धी नव्हती. हंगामाचं पीक हातातनं गेलं. त्याच्या पोटात खड्डा पडला.''

''ऊसाचं जळकं कांड घेऊन तो फोफाट्यात रेघोट्या मारत लाल डोळ्यांनी एकरभर ऊसाची राख बघत होता. त्याचं मन करपून आतून कडंगलं. डोळ्यांत पाण्याचा टिपूसई येईना. दुर्दं भरून येत होतं. पण डोळ्यावाटे ते सांडेना.''[५५]

किशाचा फड पेटल्यामुळे किशाच्या दयनीय अवस्थेचे वर्णन अतिशय योग्य मार्मिक शद्बात केले आहे. अचानक झालेल्या आघातामुळे किशाला कोणतीच प्रतिक्रिया व्यक्त करता येत नव्हती त्याचे दुःख मनातच दाटून राहिलेले.

अचानक एक दगड भिरभिरत संचालक मंडळाच्या दिशेने गेला. तो नेमका संभा खंदारेच्या पाठीत बसला. त्यासरशी वातावरण पूर्ण हाता बाहेर जाणार असे वाटून पोलिसांनी लाठीमार सुरू केला. माणसांच्या पाठीत, हातावर, डोकीत, तोंडावर सपासप् लाठ्या बसू लागल्या. लोक बिथरले. वाट मिळेल त्या बाजूने धावू लागले. सर्वत्र पळापळ सुरू झाली. लोकांच्या मागे

लागून पोलिस लाठीमार करू लागले. मग काही लोकांनी पायांतली पायताणं पोलिसांच्या दिशेनं फेकायला सुरूवात केली. खुर्च्या फेकल्या. संतापलेल्या लोकांनी व्यासपीठाचा ताबा घेतला. तिथल्या गाद्या–लोड फेकून दिले. माईक तोडला. मंडपाचे खांब उपसले. पडदे फाडले.[५६]

महात्मा सहकारी साखर कारखान्याच्या जनरल सभेत हा गोंधळ निर्माण झाला होता. झोंबडे पाटील ऊसाला दर जाहीर न करता. गोड–गोड गप्पांनी लोकांची मन वळवत होते. सभा पटकन आवरून दर जाहीर न करता निघालेले. त्यामुळे शेतकरी खवळले. सभा मंडपात दंगल झाली. लोकसंख्या जास्त असल्यामुळे गर्दी हाताबाहेर गेली.

''बायजा भाकऱ्या करीत होती. वयलावर भांड्यात कालवण ठेवलेलं चुलीतल्या जाळानं स्वयंपाकघर पेटल्यागत दिसतेलं. पायात परात धरून ती पीठ मळत होती. गोळा हातावर थापटून तवाभर. भाकरी टाकल्यावर रूंदाड्यातलं पाणी शिंपडून भाजाय टाकलेली. भाकरी लोखंडी उलथण्यानं परतायची. पापड सुटून भाकरी फुगाय लागली की चुलीतली लाकडं ढोसून, मोडून जाळ मंद करीत तव्यातल्या ऊनजाळ कढत फुगलेल्या भाकरीला अल्लाद उचलून चुलीला लावून जरा वेळानं भानवशीत उभा करून ठेवायची. पुन्हा रूंदाड्यातल्या पाण्यात हात बुचकळून परातीतलं पीठ मळायची. तिचं हे मन लावून सैपाकाचं चाललेलं चुलीतल्या जाळाच्या धगीपुढं बसून बायजाचं अंग रकशागत तापलेलं अंगातलं झंपर घामानं चिप्प भिजलेलं. तिच्या कपाळावरचं कुंकू घामानं ओलं होऊन निथळून तिच्या गव्हाळी नाकावर लालसर रेघ मारल्यागत उतरलेलं तरीही ती पीठ मळतच होती.''[५७]

हे वर्णन वाचत असताना प्रत्यक्ष बायजाचे व भाकरी करत असतानाचे प्रसंगचित्रण डोळ्यासमोर उभे रहाते. इतके परिणामकारकरीत्या ते वर्णन केले आहे. बायजाचे व भाकरी करतानाचे व्यक्तिचित्रण हुबेहुब साकारलेले दिसते.

''गाडीत जरूरीपेक्षा जास्तीच सिटा कोंबलेल्या त्यानं माणसं एकमेकाच्या अंगावर रेलून बसली. त्यात लाटेवाडीकडून पाचव्या मैलावर जाणारा रस्ता कधी काळी डांबरी होता. आता त्यावर जागोजाग वीत वीत खड्डे पडलेले. एक खड्डा चुकवायला जाऊन टायर दुसऱ्या

खड्ड्यात म्हणून टॅक्सीचा पोऱ्या खड्डे चुकवायच्या फंदात पडत नव्हता. तो आपला पट्टी धरून धाडधाड गाडी पळवत होता. त्यामुळे टॅक्सी माण्सं भरलेली बैलगाडी उधळावी तसं बेसुमार पळत होती. गाडीतल्या माणसांची आदळून आपटून दैना उडालेली. तरी सारी ते गचके सवयीने सोसत जीव मुठीत धरून घट्ट बसलेले. कुणाची कसली तक्रार नव्हती.''[५८]

या वर्णनातून ग्रामीण भाग आजही प्रगती पासून वंचित आहे हे लक्षात येते. खेड्यात रस्ते नीट नाहीत. वेळेवर एस. टी. ची सोय नाही. कारण खेड्यांना तर एसट्याच नाहीत. अशावेळी लोकांना वडापने प्रवास करावा लागतो. त्या गाडीत कितीही माणसे कोंबली, गर्दी झाली तरी प्रवासी काहीच बोलत नाहीत कारण त्यांना वेळेवर पटकन पोहचायचे असते. एकविसाव्या शतकात प्रगतिकडे वाटचाल करणणाऱ्या देशातील खेड्यांची इतकी वाईट दुर्दशा आहे.

**निसर्गवर्णन :-**

'साखरफेरा' ही कादंबरी ग्रामीण भागावर लिहलेली असल्यामुळे त्यातील निसर्गवर्णन मनोहर आहे. कारण बोरीगाव या गावाला बोरीगाव पाणी सोसायटीचे मूबलक पाणी आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता भासत नाही. सर्व वातावरण ऊस पिकामुळे हिरवेगार दिसते.

''भवतीनं अंधार घेरून होता. वर चांदण्या चमकत होत्या. त्या पुसट प्रकाशाच्या अंदाजावर तिघे पायवाटेनं चालत होत. ओढ्याच काळकिच्चं लवण दिसताच गुंडा कावड जमीनीवर उतरून थांबला''[५९]

या वाक्यातून अंधाराचे वर्णनं आलेले आहे.

''फड वाटेलगत, त्यानं फडाच्या झळा वाटेवर बडवत होत्या. तिकडे कुणालाच जाता येईना. फड जसा पेटत पुढे येईल. तसं धग पुढे सरकायची. आणि उघड्या अंगाला चटके बसू लागले. की माणसं तिथनं हलून लांब जाऊन थांबायची. फेब्रुवारी महिना त्यात दुपारच टाईम. वर ऊनाचा ताव, मग काय पेटता फड नुसत्या डोळ्यानाही सहन होईना.''[६०]

या वाक्यातून लेखक फेब्रुवारी महिन्यातील कडक उन्हाळ्याचे दर्शन घडवतात. वरील परिच्छेदामधून उन्हाळा व हिवाळा या दोन्ही ऋतूंतील वर्णनं पहायला मिळतात.

''ओढ्या काठावर झुडपात बसून गाणाऱ्या पक्ष्यांची सुरावट वाऱ्याने डोलणाऱ्या ऊस मळ्यांच्या रानावर हिरची. तांबडी कलाबूत विणीत होती सर्वत्र हिरवी अपूर्वाई दिसतेली. नदीकाठी कुरणावर कापलेल्या. गवतांचे उघडे-वागडे चौकोन धुक्यांची चादर अंगावर घेऊन पडून होते. नदीकाठच तेवढा धुक्यानं भरलेला. बाजूच्या नदीबूड रानावर त्याचा मागमूस नव्हता. दूर मळीत झाडाच्या दाटीत किलबिलाट सुरू होता. तिथही चांगली जाग आलेली.''[६१]

''आसमंतात सभोवार डिसेंबर महिन्यातील थंडीची गार लहर भरलेली. त्या लहरीतून मोत्याचे थेंब तुटावेत तसे, रानातील पायवाटांवर ऊसांच्या पानावर, झाडांच्या शेंड्यावर दहिवर टपकत होते.''[६२]

असे थंडीचे, धुक्याचे, उगवत्या सूर्याचे, पक्ष्यांच्या किलबिलाटाचे वर्णन मनोहर वाटते.

''ऊस! चांगला ज्योतिबाच्या सासणकाठीइतका उंच, शेंड्यावर फेट्यासारखा मलमलचा तुरा. पान हिरवीगार, एक-एक पान तलवारीच्या पात्यासारखं धारदार. आश्चर्य म्हणजे ऊस माणसागत किशाबरोबर बोलताय. त्याच बोलण ऐकून किशा हसतोय.''[६३]

इथे लेखकांनी केलेले ऊसाचे वर्णन अतिशय सुंदर आणि ऊसाला वापरलेल्या उपमा समर्पक आहे.

ग्रामीण कादंबरी म्हटलं की निसर्ग हा आलाच. कारण ग्रामीण कादंबरी निसर्गाशिवाय येत नाही. निसर्गवर्णनाने कादंबरीला एक प्रकारचे वेगळे वैशिष्ट्य प्राप्त होते. 'साखरफेरा' मध्ये मोजकेच कामापूरते निसर्गवर्णन आले आहे. या कादंबरीत फक्त आपल्याला ऊस आणि ऊसच दिसतो.

**निवेदन :-**

काहीसा अर्धनागरी, ग्रामीण परिसर प्रथमपुरूषी आत्मनिवेदनात्मक पद्धतीने 'साखरफेरा' ही कादंबरी साकार होते. निवेदक सुसंस्कृत आणि संवेदनशिल व्यक्ती आहे. निवेदक व पात्रे यांच्यातील काही पात्रे ग्रामीण बोलीतून बोलतात तर नोजकी नागरीभाषेतून बोलताना दिसतात उदा. तानाजी शेटे, चेअरमन झोंबडे पाटील इ. 'साखरफेरा' या कादंबरीचे कथानक बोरीगाव,

पाडळी, मनवाड, शापूर, चिंचली, लाटेवाडी, सावली या पंचक्रोशीवरती आधारीत असून सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यांचा व त्या जिल्ह्यातील काही गावांचा ठराविक प्रसंगी उल्लेख केला आहे. लेखकांनी कादंबरीमध्ये आत्मनिवेदनात्मक पद्धतीचा वापर करून शेतकऱ्यांच्या हतबल शोकांतिकेचे वास्तववादी चित्रण शद्वबद्ध केले आहे.

मोहन पाटील यांच्या लेखनात वास्तवाला जीवंत करण्याचे सामर्थ्य आहे. त्यांच्या भाषेत स्पष्टवक्तेपणा आणि सहजता आहे. साध्या सोप्या भाषेतून अतिशय अवघड प्रश्न वाचकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. साखरफेराचे निवेदन वैशिष्ट्यपूर्ण आहे. या सर्व लेखनामधून मोहन पाटील यांनी शेतकरी जीवन, शेतकरी जीवनातील समस्या, ऊस लागणीचा प्रश्न, ऊसाला योग्य दर मिळावा म्हणून केलेले आंदोलन, त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, सहकारी संस्थांमध्ये चाललेले सरधोपट राजकारण, भ्रष्टाचार, सहकारी संस्थांमधील कारभार सुधारण्यासाठी चाललेले प्रयत्न, गावोगावी चाललेले राजकारण असे अनेक छोटे मोठे प्रसंग चित्रीत करतात या माध्यमातून ते स्वतःचा दृष्टिकोन आणि शेतकरी जीवनाविषयक, तत्वज्ञान सहज सांगून जातात.

''शामा, नवाच्या ठोक्याला आलोय मी. सकाळी सकाळी खाऊन यावं तर काय जात न्हायी. बाराला भूक लागती. पोटात कावळं वरडत्यात. सायेब नाष्टापाणी करून बाराला येत्यात अगदी जेवणवेळ गाठून. बसायची पंच्याती. उठावं तर पंच्याती. आता साहेब भाईरपडूस्तर काळ्यामाळ्या घालत आमी बसायचं. तिथनं पुढं जेवण, पुन्हा दोन अडीचला सोसायटीत या, सा वाजूपातून बसा. गांड घासत. काय कामाची पद्धत झाली?''[६४]

या निवेदनातून आन्नीशाचे सहकारी सोसायटीतील कामाची पद्धत व नोकरी विषयी तिरस्कार वाटतो. कमी पगारात जास्त राबवून घेतले जाते ते ही कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त न करता.

''जीवाला मस्त वाटतंय मेंबर! मातीत आतडी तोडून राबावं. काळ्या मातीत ऊस पेरावा. त्यातनं पांढरं सोनं काढावं. पडक्या घरावर सोन्याची कौलं घालावी. चुलीतनं सोन्याचा धूर काढावा. एवढंच नव्हं, तर चांदीची चिलीम करून त्यात सोन्याची तंबाखू भरावी. तोंडातनंबी सोन्याचाच धूर सोडावा. पर ते जमणार कसं? रान मायंदाळ पिकवायचं तर आधी गाडीभर पैसा लागतोय. त्यो आणायचा कुठूनं?''[६५]

या निवेदनातून किशा सारख्या शेतकऱ्यांची कष्ट करण्याची जिद्द असून भांडवला अभावी स्वप्न पूर्ण होऊ शकत नाहीत याचा प्रत्यय येतो.

''शेती हा देशाचा कणा आहे. आणि या कण्याचा आधार शेतकरी आहे. पण गेल्या कित्येक वर्षात केवळ राजकीय षडयंत्र म्हणून स्वार्थासाठी, खुर्चीसाठी सरकारनं या देशातील शेतकऱ्याला संपवायचा घाट घातला आहे. पण तुम्हाला सांगतो मित्रांनो. हा कणा पोलादी आहे. राजकीय हेतूनं हा मोडावयाचा ठरवला तर त्यांचंच कंबरंड मोडल्याशिवाय राहणार नाही.''[६६]

असे तत्वज्ञान सांगून विषयाचे प्रतिपादन प्रभावी आणि सुलभ झालेले आहे. हे अनुभव शेतकऱ्यांच्या जाणिवेतून घेतले असले तरी त्यातील तात्वीक चिंतन व्यापक स्वरूपाचे आहे. त्याला कोणत्याही मर्यादा नाहीत. सर्व विचार मांडणीमध्ये एक प्रकारची शिस्तच आहे. त्याचबरोबर सुस्पष्टपणा आणि परखडताही आहे. या सर्व लेखनातून समृद्ध अशी वैचारिक बैठक व्यक्त होते. सुजाण सुसंस्कृतपणा जाणवतो. लेखनात कोणाविषयीही दूषित असा पूर्वग्रह नाही किंवा एकांगी दृष्टिकोन नाही. त्यामुळ सर्व विचारात एक प्रकारचा समतोल जाणवतो. मोहन पाटील यांनी साखरफेरा मध्ये भविष्यातील वर्तमानकाळातील वास्तव चित्रण कालानुक्रमे रेखाटले आहे.

**शीर्षक :-**

'साखरफेरा' हे 'मोहन पाटील' यांनी निर्मिलेले फार सुंदर रूपक आहे. सार्थ समर्पक अल्पाक्षरी आणि बहुआयामी शीर्षक. शीर्षकाला साजेसे कथानक आहे. कादंबरीतील कथानकाचे सारच या शीर्षकामध्ये सामावले आहे. हे शीर्षक वाचल्यानंतर दुसरा कोणताही विचार मनात न येता. साखरफेरा म्हणजे शेती समस्येवरती असणारा असे स्पष्ट जाणवते. परंतु लगेचच फेरा म्हणजे नेमके काय? हा प्रश्न उद्भवतो.

साखर कारखानदारी सहकारातून उदयाला आली. सहकाराच्या माध्यमातून कृषी व्यवस्थेला नवसंजीवनी मिळाली कृषिव्यवस्था व पर्यायाने शेतकरी समृद्ध झाला. कोणतीही व्यवस्था स्थिर आणि समृद्ध झाली. आणि त्यामधील अर्थसत्येचे फायदे दिसायला लागले की स्वार्थ प्रेरित भ्रष्टाचाराची नवी व्यवस्था उदयाला येते. सत्ता मिळविण्यासाठी पैसा खर्च करणे आणि आपण घातलेला पैसा शतपटीने कसा पुन्हा प्राप्त करायचा या करीता भ्रष्टाचाराची पर्यायी



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

नवी व्यवस्था निर्माण करणे हे प्रकार सहकारातूनच उदयाला आहे. साखर कारखानदारीतील, पोखरलेले भ्रष्ट राजकारण तिथली अन्याय व्यवस्था या चक्रात या फेऱ्यात (मरीआईच्या फेऱ्याप्रमाणे) पूर्वी कॉलऱ्याची साथ यायची त्या साथी मागची कारणे माहित नसल्यामुळे पटापट मरणारी माणसे मरीआईचा फेरा आला त्यामुळे मेली. अशी एक गैरसमजूत किंवा अंधश्रद्धा आहे. तसेच ऊस उत्पादक शेतकरी ज्या पिकापासून एक रकमी पैसा मिळत नाही तशी दुसरी पर्यायी पीक पद्धती उपलब्ध नसल्यामुळे किंवा त्यांच्या डोळ्यासमोर नसल्यामुळे साखर फेऱ्यात अडकलेला आहे हे मोहन पाटील यांना येथे सुचवायचे आहे.

**मुखपृष्ठाचे सौंदर्य :-**

मोहन पाटील यांची 'साखरफेरा' ही कादंबरी दर्जेदार आहे. या कादंबरीचे मुखपृष्ठ पाहिल्यानंतर थोडा विचार करायला लावते. कारण त्या पुस्तकावरती असलेला मानवी चेहरा अतिशय चिंतातूर, गंभीर, दुःखी आहे. त्याच्या चेहऱ्यावरती अनेक टिपके आहेत. ते टिपके नसून प्रश्नचिन्ह आहेत. जणू त्यांच्या समोर अनेक प्रश्न मांडलेले आहेत. प्रश्नांचे उत्तर त्याला सापडत नाही. त्या प्रश्नांचा गुंता सोडवता सोडवता तो थकून गेला आहे. हतबल झाला आहे.

त्या चेहऱ्याच्या पाठीमागे हिरव्यागार ऊसाचा फड आहे. तो फड ८०११ या जातीचा आहे. ऊस हे पीक फार पूर्वीपासून चालत आले आहे. पूर्वी या पिकाला मागणी अथवा मान्यता नव्हती. परंतु मध्यंतरीच्या काळात ऊस हे पिक अनेक लोकांनी घेतले. भरपूर उत्पादन काढले. लोक मालामाल झाले. एक टन ऊसाला एक तोळा सोन्याचा भाव मिळाला. परंतु देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर दहा-पंधरा वर्षात कारखान्यांमध्ये, संस्थांमध्ये भ्रष्टाचार वाढल्यामुळे सहकारी संस्थाना उतरती कळा लागली. कारखाने कर्जात बुडाले. कारखाना प्रशासनाला ऊसाला दर देणे परवडेना. म्हणून प्रशासन कारखाना तोट्यात येणार नाही असा विचार करून दर देऊ लागले. इथे कारखान्याच्या फायद्याचा विचार केला गेला. परंतु असा शेतकऱ्यांचा विचार आजपर्यंत कधी कोणी केला नाही. आणि पुढे करेल अशी आशा ही नाही. कारण प्रत्येकजण शेतकऱ्यांना लुबाडण्यासाठीच बसलेत म्हणून स्वतःच्या हक्कांना वाचा फोडण्यासाठी संघटना उभारली पाहजे. आंदोलन केले पाहिजे. तरच आपल्या हक्काला न्याय मिळेल. शेतकरी

कमजोर दिसणार नाही. शेतकऱ्यांची कष्ट करण्याची ताकद आहे. परंतु भांडवला अभावी ते काहीही करू शकत नाहीत. त्यातूनही त्यांनी कशीबशी जोडणी करून पिक आणले तर त्यावर नाना तऱ्हेचे रोग येतात. त्यातूनही वाचले तर त्याला योग्य दर मिळत नाही. म्हणजे जिथे तिथे संकटे शेतकऱ्यांची पाठ धरून उभी असतात. यासारखे अनेक प्रश्न आपल्याला या शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरती पहायला मिळतात.

मग, हे ऊस पिक आले कोठून यासंदर्भात 'साखरफेरा' मध्ये मोहन पाटील तुका मेंबर या पात्राच्या मुखातून सांगतात, ''ऊस हे एक प्रकारचं बांबूसारखं गवत आहे. पण ते पूर्वीपासून भारतात आहे. संस्कृतात ऊसाला इक्षुदंड म्हणतात. संस्कृतात शद्ब सापडतो म्हणजे ते प्राचीन भारतीय पीक आहे. असं म्हणता येत. पुराणातही असेल, पण त्याची मला कल्पना नाही. पण ते परदेशी नसावं, स्वदेशी आहे.''[६७]

भारतात इ. स. पू. ३२७ पासून ऊस हे पीक असल्याचे आढळते. चौथ्या ते सहाव्या शतकाच्या दरम्यानच्या काळात भारतात साखर निर्मिती सुरू झाली. ही साखर खड्यांच्या स्वरूपात होती इ. स. ६४१ मध्ये ऊस ईजिप्तमध्ये पोहचला व नवव्या ते दहाव्या शतकांमधल्या काळात तेथे प्रथम शुद्ध केलेली साखर व्यापारी दृष्ट्या निर्माण झाली.

भारतात तसेच दक्षिण आशियातील इतर देशात प्राचीन काळापासून लागवडीत असलेली ही सुपरिचित वनस्पती अनेक वर्ष जगणारी गवताची एक जात आहे. तिचे मूलस्थान आग्नेय आशिया मानतात. परंतू बँडेस या संशोधकांनी संशोधनाअंती न्यू गिनी हे उगमस्थान निश्चित केले आहे. तेथून पुढे अनेक देशामध्ये या ऊसाच्या जातीचा प्रसार झाला. अठराव्या शतकापर्यंत जवळ जवळ सर्व जगभर प्रसार झाला. महाराष्ट्रात अहमदनगर, कोल्हापूर, सांगली, औरंगाबाद, पुणे, सातारा, सोलापूर या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात झाला.

ऊस ह्या पिकाचा उपयोग बुडक्यापासून शेंड्यापर्यंत मानवाला होत असतो. याचा कोणताही भाग टाकाऊ नाही. ऊसापासून गूळ-साखर, काकवी, रस हे खाद्यपदार्थ तयार होतात. ऊसाचे शेंडे म्हणजे वाडे जनावरांसाठी, पाचट-कंपोस्टखत, वस्तुंच्या बांधणीसाठी भरणीसाठी पाचट वापरतात, चिपाड-चोथ्याचा जळणासाठी कागद तयार करण्यासाठी उपयोग होतो.

खारवट जमीनीसाठी प्रेसमेड, तसेच अल्कोहॉल, एथिल, रासायनिक खते तयार करण्यासाठीही होतो. अशा या मौल्यवान पिकाला लोकांनी मातीमोल करून ऊसाचा चोथा करून टाकला त्यामुळे लोकांची मने त्यापासून दुरावू लागली आहेत.

अशाप्रकारे साखरफेराचे मुखपृष्ठ आकर्षक, मनाचा वेध घेणारे, विचार करायला भाग पाडणारे समर्पक असे आहे.

**आशय :–**

महात्मा सहकारी साखर कारखान्याचा हंगाम संपला थोडाफार ऊस तुटायचा राहिला होता. किशाच्या ऊसालाही दोन दिवसात तोड येणार होती. एवढ्याच किशाच्या ऊसाला आग लागली. ऊस जळून राख झाला. हे बघून किशा काळवंडून गेला. काय करावे हेच त्याला कळेना अगदी चारीवेळा साधून किशाचा फड पेटला होता. तेव्हा नामा, शामा, बाळा, जयसिंगअण्णा यांनी किशाचे सांत्वन केले. त्याला धीर दिला. तरीही किशाचे मन शांत होईना. तेव्हा जयसिंगअण्णा किशाला म्हणाले.

''कसला बापय तू? किशाबा ऊस पेटला तर रडतूस. ऊठ आता तुजा ह्यो जळका ऊस कारखाना लगीच न्हेतोय जळक्या ऊसाला दिडशे दोनशे दर हाय. टनेज घटणार खरं. धा पंधरा टन जरी ह्यो ऊस भरला तर तेवढंच दोनेक हजार मिळतील. सोसायटीची काय बाकी असली तर औंदाच्या वर्षी आमी तटवून धरतो. म्होरल्या ऊसातनं थोडथोडकी भर म्हणं. ऊठ मर्दा काय तरी आसं घोड्याला गाढव लावून आताची ही येळ मारून काढ. पुढं ऊस आला का मग सुराला लागतंय ऊठ रडून भेकून ऊस का परत येणार?''[६८] अण्णांच्या अशा या बोलण्याने किशाला जर धीर आला. दुःखातून बाहेर पडण्यास मदत झाली. इथे निवेदकांनी ऊस जळल्यामुळे किशाची कशी अगतिकता झाली त्याचे सांत्वन कसे केले. तसेच त्याला पुन्हा जोमाने उभे राहण्यास कसे प्रोत्साहन दिले. याचे अतिशय मोजक्या शद्बातील वर्णन समर्पक आहे.

ऊस जळल्यानंतर नामा, शामा, बाळा, जयसिंगअण्णा लगेचच पळत गांवधरीला किशाकडे जातात. किशाला मदत करण्याचे आश्वासन देतात. जयसिंग अण्णा सोसायटीचे कर्ज

थांबविण्याचे सांगतात. तर नामा आरेकर स्वतःच्या गेलेल्या ऊसाचे बिल येताच तुला लागणीला मदत करीन असे सांगतो. इथे आपल्याला नामा, शामा, किशा, बाळा यांच्यामध्ये असलेले मैत्रीचे एकमेकांना सहकार्य करण्याचे अतूट नाते पहायला मिळते.

किशाचा ऊस जळल्यानंरतही काही दिवसात किशा पुन्हा जोमाने कसा उभा राहिला याचे वर्णन अतिशय सुंदर शद्वात मोहन पाटील यांनी केले आहे.

''पेटलेल्या ऊसाचा वणवा विझून गारढोण झाला. किशाच भरकटलेलं मनही थाऱ्यावर बसलं. त्याच्या हल्लक मनात उभारी भरू लागली उरातली दुःखाची कडवड वेदना कमी होऊन त्या जागी आता गोडसर खपली धरली त्या प्रसंगानंतर तो पहिल्यांदाच पायात पायताण आडकून नव्या जोमाने बाहेर पडला.''[६९]

शेतकऱ्यांच्या वाट्याला कितीही कसलीही दुःख आली. तरीही तो शेतकरी ती दुःखे विसरून आनंदाने पुढील आयुष्याला सामोरे जाताना दिसतो.

नव्याने मनाला तरतरी आल्याने किशा घरातून बाहेर पडतो. चालताना तो नविन ऊस लागण करण्याचा आणि कर्ज कसे फेडायचा विचार करत असतो. इतक्यात गणपा न्हाव्याचे दुकान येते नेहमीच्या सवईप्रमाणे तो दुकानात जातो. गणपा त्याचे प्रेमाने स्वागत करतो. गणपालाही किशाचे ऊसाचा फड पेटलेले प्रकरण माहित होते. तो किशाला पुन्हा नव्याने लागण करण्यास सांगतो. तेव्हा किशा गणपाला सांगतो की त्याचं ऊसावरनं मन उडलय. ऊसात काही तथ्य राहिलय असे त्याला वाटत नाही म्हणून किशा म्हणतो, ''आता ऊसात तर काय न्हायलंय? ऊसाचं भूस झालंय समदं. सारी देणी भागवून हातात काय न्हातंय? कारखाना तर ऊसाला दर कुठ देतोय बोंबलायला?''[७०]

आपल्याला 'मोहन पाटील' किशाच्या माध्यमातून लोकांच्या मनात सध्याची ऊसाची परिस्थिती कशी काय आहे. कारखाना ऊसाला दर देईल का याचे चित्रण स्पष्ट करतात.

''वाईस कळ काढा. पुढं-पुढं ऊसाला दर हाय-औंदा न्हाई, अड्यालसाली न्हायी, त्येच्या अड्यालसाली न्हायी, तर कुठंलाच दर कसा मिळणार? आत्ताच कारखानं सारं डबघाईला आल्यात कर्जात बुडल्यात साऱ्या गप्पा हाईत. ह्या वाढीव दराच्या गप्प बस उग.''

''कारखाना कर्जात हाय म्हंत्यात ते सार राजकारण हाय नाटकं हाईत हेंची. मग संचालकांच्या चेअरमनच्या गाड्या कशा पळत्यात त्येला कुठनं पैसे आणत्यात? वाईस थांबा हेंची सगळी नाटक बंद हुत्यात लई उशीर न्हायी. म्होरल्या सालीच बघा ऊसाच्या दराचं.''[७१]

गणपाचा न्हाव्याचा व्यवसाय असून तो कंटाळला होता. त्यालाही त्यात परवडत नव्हते. गणपाला रोज पाचपंचवीस रूपये तरी रोख मिळत होते. शेतकऱ्यांसारखे ह्या वर्षाचे त्या वर्षाला पैसे येणार नव्हते. म्हणून गणपा म्हणतो.

''आयला या पुढारी वळूस्नी निवडून बी आमीच द्याचं आणि त्येंच्या नावानं बोंबलतबी आमीच बसायचं त्येचं कायबी वाकड होत न्हाई. आयला ह्या खोक्याचं कर्ज आजूनबी फिटना झालंय पॉट कसं भरायचं? कर्ज कशातनं फेडायची सांगा की दोन रूपयाची दाढी पाच रूपये झाली. तरीबी काय मेळ बसं ना. गिऱ्हाईक तर बगतूस कशी असत्यात ती.''[७२]

कोणताही व्यवसाय करणारा असो वा शेतकरी असो प्रत्येकाच्या तोंडी परवडत नाही, परवडत नाही हे शद्ब असतातच मग नक्की परवडते कोणाला.

पंधरा दिवसानी कारखान्याचा हंगाम संपला. कारखान्यातील हंगामी कामगार कामावरनं कमी झाले. ते आता पुढच्या गळीत हंगामाची वाट पहात घरी बसणार. मधल्या काळात मशनरीला तेलपाणी दुरूस्ती चालणार. कारखान्यात फक्त कायमच्या कामगारांची हालचाल चालू. अशा प्रसंगी हंगामी कामगारांच्या पुढे कारखाना बंद पडल्यावर केवढा मोठा प्रश्न उभा राहतो. उरलेल्या दिवसात त्यांनी काय काम करायचे. आपला चरितार्थ कसा चालवायचा. ज्यांच्याकडे आर्थीक बाजू मिळवण्याचे इतर मार्ग आहेत त्यांचे ठिक बाकीच्यांनी काय करायचे? असे अनेक प्रश्न इथे उभे राहताना आपल्याला पहायला मिळतात.

किशाला जळक्या ऊसाच बिल मिळताच त्याने गोठ्यातील सोन्या सारखी जनावरे विकली. जनावरे विकताना किशाची पत्नी बायजा रडरड रडली. मुलगा विकासन तोंड वाकडे करून बसला होता. जनावरे विकलेले पैसे, अधिक ऊसाचं बिल असं मिळून कर्ज भरले. थोडी सोसायटी मुद्दामच ठेवली. कारण पुन्हा खर्चाला काय करणार किशानं जनावर विकलेली कळताच शामा पळत किशाकडे आला कारण त्यालाही खूप वाईट वाटले.

जयसिंगअण्णा हे बोरीगाव सोसायटीचे चेअरमन होते. सोसायटीतील स्वस्त धान्य दुकान आणि रॉकेल डेपो गैर कारभार केल्यामुळे बंद पडले होते. खत विभागाची गरजच असल्याने तो कसा बसा चालू होता. अण्णा पाणी सोसायटी तेवढी प्रामाणिकपणे चालवत. सोसायटीतील कामगार जसे काही आपल्याच घरचे खाजगी कामगार असल्यागत घरची सर्व कामे त्यांना लावत. अण्णा पंचायत समिती कारखाना जिल्हा परिषद यासारख्या ठिकाणची लोकांची कामे पटकन करून देत. ती करून देताना एखाद्या कडून हजार–पाचशे रूपये खात त्यातून अधिकाऱ्यांना पार्टी देत. अण्णांना आता गावातील पाणी सोसायटीचा कंटाळा आला होता. म्हणून ते प्रत्येकाजवळ आपल्या संचालक पदाची शिफारस मोठ्या साहेबांच्याकडे करायला सांगत अण्णांना आता मोठ्या खुर्चीची ओढ लागली होती. त्यांचे मोठा पुढारी होण्याचे स्वप्न होते. माणसाला कितीही मिळाले तरी त्याची हाव पूर्ण होत नाहीत आहे त्या परिस्थितीत तो सुखी राहू शकत नाही. तसेच संस्थेमध्ये कामाला असणारे कामगार हे जणू काही ह्यांच्याच मालकीचे असल्यासारखे त्यांना खाजगी कामे करायला लावतात. ती बिचारी कामगार मंडळी मनात नसतानाही नोकरी जाण्याच्या भीतीने त्यांची कामे करतात. कारण त्यांच्या सर्व नाड्या ह्या अधिकाऱ्यांच्या हातात असतात. थोडी जरी त्यांच्या विरूद्ध हालचाल केली तरी कोणतेही कारण लावून ते नोकरीवरून काढू शकतात जणू काही संस्था यांच्याच मालकीची असल्यासारखे वागतात.

शेतकऱ्यांचे त्याच्या घरातील मंडळीचे जनावरांवर कुटुंबातील सदस्यान प्रमाणे प्रेम असतं. याचा प्रत्यय येतो. कारखान्याची जनरल सभा सप्टेंबर महिन्यात दहा तारखेला होती. ही बातमी पेपरमध्ये वाचून विरोधकांनी शेतकरी संघटनेला पाठिंबा दिला. आणि सभा उधळून लावायचा बेत आखला कारण विरोधकांनाही तेवढेच पाहिजे होते. आपल्या शत्रूला दमवायला त्यांना निमित्त सापडले होते. आंदोलनाचे वारे सगळीकडेच वाहू लागले. त्यामुळे कारखाना प्रशासनही सतर्क झाले होते. झोंबडे पाटील यांनी स्वतः गावोगावी जावून ऊस शेतकऱ्यांच्या भेटी घेतल्या. सभा शांततेने पार पाडावयासाठी समजूत काढली नंतर कारखाना प्रशासनाने साखर उद्योग भयंकर संकटात आहे. त्यामुळे त्यातूनही मार्ग काढून ऊसाला योग्य भाव देऊ. शेतकऱ्यांनी कारखान्याच्या पाठीशी उभे रहावे साखर उद्योग संकटात सापडल्यावर आता आम्ही तरी काय करणार अशा अनेक समस्या वृत्तपत्रातून जाहीर केल्या. म्हणजे शेवटी स्वतःमुळे निर्माण झालेल्या समस्या अंगाबाहेर टाकून ऐटित फिरायला रिकामे जणू आम्ही काही केलेच नाही.

शेतकरी संघटनेनेही रान पेटवलेलं त्यांनी या सर्व परिस्थितीला कारखाना प्रशासनच जबाबदार आहे असे ठणकावून सांगितले. आणि कारखाना प्रशासना विरूद्ध एक निवेदन जाहीर केले. आणि त्यातून कारखाना प्रशासनाने कारखाना कसा मोडकळीस आणला, कसा भ्रष्ट केला याचे अतिशय मार्मीक शद्वात वर्णन 'मोहन पाटील' यांनी 'साखरफेरा' मध्ये केले आहे. कारखाना प्रशासनाने जिथे-जिथे शक्य होईल तिथे-तिथे भ्रष्ट कारभार करून कारखाना डबघाईला आणला.

अशा निवेदनांनी वातावरण खूपच तापले. शेतकरी संघटनेला त्यामुळे अनेक बाजुंनी पाठिंबा मिळाला. वृत्तपत्रातून रकानेच्या रकाने सभांच्या वृत्तांनी भरू लागले आणि कारखाना प्रशासन कोंडीत सापडले. तेव्हा त्यांनी सरकारकडे गाऱ्हाणे मांडले. सरकारला कारखान्याची परिस्थिती कळवली. तरीही शेतकरी मागे सरकले नाहीत. वृत्तपत्रातून पंधरा दिवस उलट सुलट आवाहने, निवेदनांचे युद्ध चाललेले. कोण कोणाला कमी समजत नव्हते. कारखान्याच्या जनरल सभेत गोंधळ होणार याची अफवा सर्वत्र पसरली होती. त्यामुळे कारखाना प्रशासन सतर्क होते. कडेकोट पोलिस बंदोबस्त केला होता. सभासदाना सभेला येता यावे म्हणून गावोगावी गाड्या ठेवलेल्या सभेची वेळ येताच. लोक जमू लागले. ऊसाला बाराशे रूपये दर मिळालाच पाहिजे या घोषणांनी परिसर हादरून गेला. एवढ्यात झोंबडे पाटलांची गाडी आली. पाटलांच्या समर्थकांनी त्यांचा जयजयकार केला. तेवढ्यात कारखान्याचे चेअरमन संचालक यांचा ताफा सभास्थानी दाखल झाला. सभेला सुरूवात झाली. झोंबडे पाटलांचे भाषण सुरू झाले. पाटलांच भाषण इतक प्रभावशाली होते की त्यामुळे महत्वाच्या प्रश्नाला बगल मिळाली. त्यामुळे संघटनेचा कार्यकर्ता भानूसिंगला राग आला त्याने पाटलांना गोड भाषण बंद करायला लावले. त्यामूळे सर्व शेतकरी भानावर आले आणि त्यांनी आपला प्रश्न सभेत मांडला. सभेत एकदम गोंधळ उडाला. त्यामुळे पोलिसांनी लाठीमार सुरू केला. कोणाला कुठे पळावे काहीच सुचेना जो तो वाट मिळेल तिकडे धावू लागला. बघता बघता सभेची जागा ओस पडली. अशा विचित्र परिस्थितीत कारखान्याची सभा आटोपली. ना कुठला ठराव मंजूर झाला, ना कुठला मुद्दा जाहीर. गरीब बिचारी शेतकरी जनता बघता-बघता कशी फसते याचे उदाहरण इथे पहायला मिळते. झोंबडे पाटलांच्या प्रभावी भाषणानं शेतकऱ्यांना एवढे मंत्रमुग्ध केले की ते आपला मूळ प्रश्न विसरूनच गेले आणि मन लावून भाषण ऐकत बसले.

सभा संपताच किशा घरी गेला. बायको बायजाने मिंत्या केल्या तरी जेवला नाही. तसाच झोपला झोपत त्याला स्वप्न पडले. त्याला स्वप्नात पांढरे उंदीर माळाचं सोन करायला आल्याचे दिसले. तसेच माळावर जत्राही भरलेली दिसली. पाऊस पडावा म्हणून सगळ्या गावकऱ्यांनी गाढवाची पूजा केली. असे जगावेगळे अनोखे स्वप्न किशाला पडले होते. प्रत्यक्षात तर किशाला ऊसाविषयी प्रेम होतेच पण आता स्वप्नातही त्याला ऊस दिसू लागला होता.

किशा दररोज सकाळी अंगणात बसायचा त्याला शेजारचा चूलत भाऊ गजा खोताचा हेवा वाटायचा. गजाची श्रीमंती राहणीमान पाहून आपणही असेच रहावे असे वाटे. परंतु कितीही कष्ट केले तरी किशाला जय मिळत नव्हता. एवढं कष्ट करून आणलेला ऊस जळून राख झाला. पुन्हा यावर्षी तीच अवस्था सुधारण्याचे काही नाव नाही.

कंटाळा आला की किशा ग्रामपंचायतीच्या पूढे वडाच्या कट्ट्यावर जाऊन बसायचा मित्रांच्या बरोबर खूप गप्पा मारायचा. बिडी ओढायचा. बिडी ओढताना त्याला खूप बरे वाटायचे माणसाला कंटाळा आला की तो छोट्या छोट्या गोष्टीतही सुख शोधत असतो. बायजाचे व किशाचे बरोबर जमत नसे. बायजा किशाच्या फाटक्या संसाराला ठिगळे लावून कंटाळली होती. त्यामुळे ती किशाबरोबर भांडायची. ती किशाबरोबर भांडत असली तरी मनातून तिचे किशावर खूप प्रेम होते. ह्या दोघा पती–पत्नी मध्ये जरी भांडणं होत असली तरी आतून या दोघांचे एकमेकावर खूप प्रेम होते.

महाराष्ट्रात साखर कारखाने निर्माण झाल्यापासून ज्वारी, बाजरी, गहू यासारखी निरनिराळी पिके गेली आणि ऊस आला. जो तो ऊसाच्याच मागे धावू लागला. इतर पिकांना काही किंमतच राहिली नाही. ती मातीमोल झाली. म्हणून मोहन पाटील म्हणतात की, ''भागात साखर कारखाना उभा राहिला तेव्हापसनंच जोंधळ, तूर, तंबाखू ही सोन्याच्या मोलाची पिकं होती ती आभाळात उडून गेली. ह्या ऊस पिकाला पुढाऱ्यांनी प्रोत्साहन द्यायला सुरूवात केली. पाणी सोसायट्या काढल्या. नदीवर मोठी जॅकवेल बसवली. बरड माळावर पाटानं पाणी खेळू लागलं. सगळीकडे ऊसच ऊस झाला.''[७३]

अशी बिकट अवस्था ऊस पिकामुळे इतर पिकांची झाली. त्यात आणि ऊसाला इतर पिकांसारखे कष्ट नाही कमी कष्टात भरपूर पैसे देणारे पिक असल्यामुळे जो तो ऊसाच्या मागे धावू

लागला. ऊसामुळे माणसांच्या परिस्थितीत बदल कसा होतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे मोहन पाटील यांनी रंगवलेले गजा खोताचं चित्र होय. मोहन पाटील सांगतात– ''गजा, किशाचा चुलत भाऊ, दहा वर्षामागे त्याच्या घरात खायला अन्न नव्हतं, ताटात ज्वारीच्या कण्या आणि डाळीची आमटी. आता आवठड्याला त्याच्या चुलीवर मटण शिजतय. त्येचा वास गल्लीभर दर्वळतोय, गळ्यात चेन, भारी कापडं? कुठनं आलं हे?[७४] ऊसाच्या पीकामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती तर सुधारलीच पण पैसा आल्यामुळे समाजात त्यांना मानाचे स्थान मिळाले. पैसा नसल्यावर कोणी विचारतही नाही. हे बघून किशाच्या मनात नवीन लागण करण्याचा विचार ठाम झाला. परंतु लावणीच्या खर्चाची जुळणी होत नव्हती. तेव्हा त्याच्या मनाची झालेली दयनीय अवस्था याचे वर्णन अतिशय योग्य शद्वात मोहन पाटील यांनी केले आहे.''

''त्या विचारानं तो दाट फडात आत आत शिरल्यागत घोटाळू लागला. त्याच्या अंगाला ऊसाची धारदार पानं कापू लागली. त्याचे ओरखडे मनावर उठू लागले. पण ऊसाच्या विचारानं एरगाटलेल्या किशाला कशाचीच शुद्ध उरली नाही तसाच उठून चालत तो पंचायतीच्या आवारात कट्‌ट्यावर येऊन टेकला.''[७५] ऊसाच्याच प्रतिकाचा वापर करून किशाच्या मनाचे केलेले वर्णन समर्पक वाटते.

किशा पारावर एकटाच बिड्या ओढत बसलेला एवढ्यात तिथे तुका मेंबर आले. तुका मेंबर ही बडी आसामी. लोक त्याना खूप आदराने वागवत कोणतीच सत्ता त्यांच्या हातात नव्हती. तरीही भागातले सर्व पुढारी त्यांची कामे करत. शेतकऱ्यांविषयी त्याना खूप कळवळा होता. राजकारणाचा खूप अभ्यास होता. किशानं तुका मेंबर पुढे ऊसाचे गाऱ्हाणे गायले, तेव्हा मेंबरनी किशाला ऊस विकास योजनेचे अनुदान घेवून ऊस लावायला मदत करू असे सांगितले. तुका मेंबर शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी झोंबडे पाटलांना सांगतात की, ''लोकशाही प्रक्रियेत माणसाला श्रीमंत करण्याचा विचार नाही. तर सामान्य माणसाचा स्तर उंचावण्याचा व्यापक विचार आहे. सर्वसामान्य शेतकऱ्यांची थोडीशीच अडचण सोडवण्यासाठी जर का त्याला मदतीचा हात दिला तर जो गाळात रूतत चाललाय तो वर येईल. इतर अनेक जण चालतात तसा तो रस्त्यानी पाय टाकीत त्यांच्या मागनं मागनं का असेना निदान चालेल तरी नाही तर तो आणखीच गाळात रूतायचा.''[७६]

शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी ते आटोकाट प्रयत्न करत तुका मेंबरनी किशाच्या लागणीच अवघड दुखणं सोडवलं. तेव्हा पासून त्याला बरे वाटत होते. एकदा किशा कातरवेळेच्या सुमारास अंगणात उभा होता. तेव्हा गजाने अंगणात गाडी लावलेली होती. गजाचा मुलगा गाडीशी खेळत होता. खेळता खेळता गाडी पडणार हे लक्षात येताच किशा पळत गेला आणि गाडी व त्या मुलाला पकडले. हे बघून गजालाही आपल्या चूलत भावाविषयी प्रेम वाटले. हे सगळे प्रकरण शांत झाल्यावर किशा मनात विचार करू लागला की, पडणारी गाडी बघताचं आपले पाय आपोआप कसे गाडीकडे उचलले. इथे आपल्याला असे आकलनं होते की कोणतीही गोष्ट आपल्याकडे नसेल तर त्या गोष्टीविषयी हेवा वाटतो यात काही नवल नाही. आपल्या मनाने आपण त्या गोष्टीकडे आकर्षिले जातो.

गजाने किशाला सोसायटीत बोलवल्याचा निरोप सांगितला. किशाच्या ऊस अनुदानाचं नक्की झालं होतं. शामा, गुंडाच्या मते ऊस अनुदान देताना ते वाजत गाजत का द्यायचे. बघितलं तर कारखाना कर्जच देणार आहे. तेही ऊसाच्या बिलातून कापून घेणार मग हां गाजावाजा कशासाठी? मदत काय अण्णा बाबाच्या खिरीसारखी फुकट नाही. म्हणून मोहन पाटील 'साखरफेरा'मध्ये गुंड्याच्या माध्यमातून सांगतात की, ''खुळ्यांनो, कारखान्यावर खुर्चीत बसल्यालं चेअरमन, संचालक मंडळ काय खुळं न्हायीत. हे राजकारण हाय. मदत करायची वाजत गाजत मदत केली का पेपरात बातमी छापून येती. फोटू येत्यात. ती बातमी वरपर्यंत गेली का पक्षाच्या वरिष्ठाकडनं शाबासकी मिळत्या. मग खाली हेंच्या खुर्च्या घट्ट हुत्यात हे सगळं खुर्च्याचंच सुताड गुताड हाय. खाली बोंब मारल्याशिवाय वर ऐकू जात न्हायी. म्हणून हे सारं वाजत गाजत करायचं आस्तंय. लोकशाही हाय ही. लोकशाहीत वाजप महत्वाचं, जेचं वाजप चांगल तिकड लोकांची गर्दी.''[७७] म्हणजे जो तो सत्ता टिकविण्यासाठी वाट्टेल ते करतो. शेतकऱ्यांना निरनिराळ्या सवलती जाहीर करून राजकारण्याना चरायला कुरण रिकामेच असते.

कारखान्याच्या शेती ऑफिसमध्ये ऊस विकास योजनेचं वाटप होणार होतं. सर्व व्यवस्था झालेली. शिंगटे साहेबांच्या हस्ते ऊस विकास योजनेच्या अनुदानाचे वाटप, प्रथम किशाला देऊन सुरू झाले. ह्या गोष्टीचा आनंद साजरा करण्यासाठी शामा जयसिंगअण्णांनी पार्टी करायची ठरविली.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पार्टीत शामा, जयसिंगअण्णा, गुंडा, भरमू, गजा खोत अशी मंडळी होती. त्या पार्टीला किशालाही निमंत्रण दिलेले पुढारी लोकांना अशी पार्टी, मेजवानी वगैरे करण्याची खूप हौस. बरोबर एखाद्याचे काम करून त्याला पटवून त्याला पार्टीसाठी तयार करत. तोही बिचारा आपले काम केले असल्याने मनात नसतानाही तयार होई. शेतकऱ्याला जिथे जाईल तिथे लुबाडण्याचा प्रयत्न ही मंडळी करत असतात.

दुसऱ्या दिवशी लवकर उठून किशा आवरतो आणि लाटेवाडीला बँकेत चेक वटवायला जातो. चेक वटवायच्या आधी तो त्याच्या मुलाला विकासला फडतरवाडीला आणायला जाणार असतो. इतक्यात त्याचे लक्ष बँकेतील गर्दीकडे जाते. गर्दी बघून त्याला ऊस विकासाचं पेव फुटल्यासारखं वाटलं. त्याने नियोजन बदलले. आधी चेक वटवायला आणि पुन्हा फडतरेवाडीला जाऊन विकासला घेऊन यायचं ऊस विकास योजनेसाठी जमलेल्या माणसांना बघून मोहन पाटील सांगतात की. ''खुळा हाईस तू किशाबा पैसा म्हंटला का धडाधडा उड्या पडत्यात तो फुकट मिळतोय का व्याजानं मिळतोय हेचा विचार नसतोय डोस्क्यात माणसाची आशा सुटत न्हायी. शेतात काय पैसा पेराव तेवढा मातीत जिरतोय. हल्लीच्याला वाटतंय आपूनबी पैसा पेरला तर त्यो दुप्पट हुईल. पर त्याची गॅरंटी न्हायी. सगळ बेभरवशी काम शेतीच गणित वेगळं नोकरदाराचं काम म्हैन्याच्या म्हैन्याला हमखास झरा ताज्या पैशाचा आपल्या साऱ्यास्नी हे असलं लागतय.''[७८]

शेतकऱ्यांकडे ह्या वर्षीचे त्या वर्षी पैसे येतात. नोकरदाराकडे मात्र महिन्याच्या महिन्याला पैसे येत असतात. शेतकऱ्यांवर पैशाची अतिशय बिकट अवस्था असते म्हणून शेतकरी सतत आर्थिक टंचाईग्रस्त असतो. त्यामुळे त्याला अशा कर्जाऊ व्याजाच्या रकमा घ्याव्या लागतात. कारण ती वेळ पुढे नेणे गरजेचे असते आणि वर्षानुवर्षे त्या व्याजाच्या रकमा भरण्यात घालवतो. किशा फडतऱ्यांच्या वस्तीकडे निघाला होता. रस्त्याने चालत जाताना वाटेतच पाणी साठलेले डबके होते. त्यातून वाट करीत किशा निघाला इतक्यात त्याला पाटकरी भेटला. पाटकरी चिडला होता कारण माणसं वावराला पाणी लावतात आणि घरी निवांत बसतात. त्यामुळे पाणी नको तिकडे वहाते पाण्याचा खूप अपव्यय होतो. इथे पाणी आहे म्हणून त्यांना पाण्याची किंमत नाही. ज्या गावाला दुष्काळ आहे त्यांना पाण्याचे मोल समजते. ऊस आल्यामुळे लोक सुधारले. लोकांच्या हातात चार पैसे खेळू लागले

त्यामुळे लोकांना पैशाची मस्ती वाटू लागली. जो तो स्वतःला शहाणा समजू लागला चार पैशाच्या धुंदीने राजकारणात उतरू लागला. राजकारणात जावून खुर्ची मिळवून भ्रष्टाचार करू लागला. सर्व संस्था मोडकळीस आणल्या.

थोड्याच दिवसात महात्मा साखर कारखान्याचा बॉयलर कोणताही साग्रसंगीत कार्यक्रम न करता मोजक्याच लोकांच्या उपस्थितीत थंडपणाने पेटवला. पेपरमध्येही ही बातमी आली होती. पण आतल्या कुठल्यातरी पानावर. ऊस उत्पादक शेतकऱ्यांवर ही बातमी वाचून काही फरक पडला नाही. उलट शेतकरी संघटनेच्या हालचालींना गती आली होती. त्या धगीने राबणाऱ्या मनगटात उष्ण रक्ताच्या लाटा उसळत होत्या. मस्तकात आंदोलनाची ईर्षा पेटत होती. प्रत्येक शेतकरी युद्धावर जाणाऱ्या सैनिकासारखा दृढनिश्चयी बनत होता. त्यांच्या धमन्यातून नसानसातून आंदोलनाच्या धडकेसाठी स्फोटकं ठासून भरली जात होती.

अशी रक्त उसळणारी वाक्य ऐकून शेतकरी जोमाने उभे रहात होते. ऊसाला दर मिळविण्यासाठी केलेल्या आंदोलनाशिवाय त्यांना काही सूचत नव्हते. प्रत्येक शेतकरी जोमाने संघटनेच्या कार्याला लागला होता. प्रत्येकाच्या नसानसातून रक्त उसळत होते. काही तरी करण्यासाठी धडपडत होते. प्रत्येकाने संघटनेच्या कार्यासाठी स्वतःला वाहून घेतले होते.

संघटनेचे ऑफिस बोरीगावात होते. बोरीगावातून जिल्हाभर सुत्र हलत होती. जिल्ह्याशी, महाराष्ट्राशीही तिथूनच संपर्क होत होता. भानुसिंग संघटनेचा प्रमुख नेता होता. त्याने गावोगावी जाऊन आंदोलनाचा, संघटनेचा अभ्यास गेली दहा वर्ष केला होता. त्यामुळे त्याने सर्व कार्यकर्त्यांना विश्वासात घेतले होते. तो नेहमी शेतकऱ्यांना आपल्या मनातील शंकाचे निरसन करून घ्यायला सांगायचा कारण त्याच्यामते आपलं काही चुकतंय का? किंवा शेतकऱ्यांच्या मनात काय विचार चाललेत हे समजते. या गोष्टीवर योग्य मार्ग काढता येतो. आणि एकमेकांनवरचा विश्वास अतूट होतो. भानुसिंगने आपले निर्णय कधी शेतकऱ्यांवर थोपवले नाहीत. तर त्यांचीही मते जाणून घेऊन निर्णय घेतले. भानुसिंग व इतर कार्यकर्त्यांच्या अध्यक्षतेखाली बोरीगावात सभा चाललेली तेव्हा शेतकरी आपली मते मांडीत होते. तेव्हा भानुसिंगने शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे समर्थन करण्यासाठी असे मत मांडले की, ''आंदोलन चालू ठेवायचं हे आंदोलन कोण्या एका साखरसम्राटाविरूद्ध नाही. लक्षात ठेवा हे

आंदोलन भारतातल्या संबध ऊसकरी शेतकऱ्यांचं हाय आणि ऊसाचा हमी दर बांधून देणं हे सरकारचं काम आहे. तेव्हा असं मनात आणू नका. एकदा सरकारनं दर जाहीर केला की सगळ्या कारखान्याला ते बंधनकारक आहे. आमचं भांडण आता सरकारशीच आहे. सरकार काय नि साखरसम्राट काय, दोघे एकाच माळेचे मणी. सरकारला फॅक्टऱ्या चालवायच्या असतील तर इथनं पुढं ऊसाला दर आम्ही म्हणतो त्यो दर द्यावाच लागंल आपण कुणाबरोबर लढतोय ते आधी धेनात घ्या.''[७९] भानुसिंगच्या खड्या आवाजातील हे भाषण ऐकून पुढे बसलेले शेतकरी एकदम प्रभावित झाले. आणि प्रभावित होणारच याला काही प्रश्नच नाही. भानुसिंग सारखा जर परखड, कुशल संघटक, हुशार, दूरदृष्टीचा, सभ्य, प्रामाणिक नेता असेल तर कोणत्याही आंदोलनाला विजय मिळाल्याशिवाय राहणार नाही.

शामा व नामा दारूच्या दुकानात गेले तेंव्हा नामाने दारू पिणार नाही म्हटलं तरी माझ्यासाठी चल म्हणून शामाने त्याला दारूच्या दुकानात नेले. शामाने हवी तेवढी दारू पिली. दुकानातून बाहेर आल्यावर दुकानासमोर बसलेल्या खातून कडून खारीडाळ विकत घेतली. ती खात खातच त्याला हुंदका फुटला. दारू चढल्यामुळे आपल्या फाटक्या प्रपंचातील एक एक गोष्टीचा उलगडा तो नामा पुढ रडत रडत करू लागला. शामाला आपण काय सांगतोय हे ही कळत नव्हते. दारू पिल्यामुळे आपण नशेत काय सांगतोय याचेही भान दारू पिणाराला नसते. दारूच्या नशेत ती व्यक्ती मानपान, मर्यादा सर्व विसरून जाते. एका वेगळ्याच प्रकारची उर्मी, नशा, त्या व्यक्तीच्या शरीरात येते. त्यामुळे काही वेळासाठी तो सर्व विसरतो आणि एका वेगळ्याच विश्वात वावरतो. हे आपल्याला शामच्या वागण्यातून, वर्तनातून स्पष्टपणे पहायला मिळते.

शामाची ही अवस्था पाहून किशा, नामा त्याला धीर देतात. किशाचा नामाचाही फाटका प्रपंच असताना ते शामाला मदत करतो म्हणून आश्वासन देतात. आणि त्या दुःखातून शामाला बाहेर काढण्याचा प्रयत्न करतात. त्याला व्यवस्थित त्याच्या घरी पोहचवतात. शामा, नामा, किशा यांची अतूट मैत्री एकमेकांविषयी असलेले स्नेह एकमेकांना मदत करण्याची इच्छा याचे वर्णन हृदयाला पीळ पाडणारे आहे.

किशाने एकदाची लावण करायचे नक्की करून कामाला सुरूवात केली सकाळच्यावेळी रानात जाताना मुलगा विकास त्यांच्या मागे लागला. किशाही त्याला घेऊन जाऊ लागला. कारण एकुलता एक मुलगा असल्याने त्याला मोडती घालणे किशाच्या जीवावर आले. नाही म्हटलं तर तो रडेल. परंतु हे काही बायजाला आवडले नाही ती चिडली. बायजाला विकासने बापासारखे शेती न करता शाळेत जाऊन शिकून मोठा साहेब व्हावे असे वाटत होते. शेवटी कोणत्याही आईची अशी इच्छा असणे साहजिकच आहे. कोणत्या आईला आपले मूल चांगले शिकू नये असे वाटते.

गजा खोताने किशाला लावण आटोपायला सांगितली कारण लवकरच आंदोलन चालू होणार होते. हे ऐकून किशाने जोमाने लागणीला सुरूवात केली आणि ती आपल्या मित्र मंडळींच्या मदतीने आटोपली. सोमवारी किशाची लावण संपली आणि शुक्रवारी शामाची. त्याच दिवशी कारखान्यावर महत्त्वाच्या विषयावर बैठक बोलविण्यात आली होती. त्यात झोंबडे पाटलांनी गळीत हंगाम सुरू करण्याविषयी तसेच कारखान्याची अवस्था कशी काय आहे. शेतकऱ्यांनी दरासाठी केलेले आंदोलन म्हणजे त्यांचा कारखान्याविषयीचा गैरसमज आहे, वाढती महागाई, नवनवीन कारखाने त्यातून होणाऱ्या स्पर्धा, नोकरांचे पगार, तसेच काहीही करून ऊस गळीतासाठी कारखान्याला आलाच पाहिजे. इत्यादी अनेक गोष्टी मार्मिकपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

वृत्तपत्रांतून साखर कारखान्याने ऊसकरी शेतकऱ्यांना हात जोडून विनंती केल्याचे आवाहन पहिल्याच पानावर आले होते. त्यामध्ये कारखान्याच्या मान्यवरांनी शेतकऱ्यांना आंदोलन मागे घेऊन ऊस कारखान्याला पाठविण्यासाठी विनंती केली होती तसेच शेतकऱ्यांच्या नुकसानाला शेतकरी संघटना जबाबदार असल्याचे सांगितले होते. अशा या विनंत्या म्हणजे शेतकऱ्यांची दिशाभूल करून फसवणूक करण्यासारख्या असतात कारण गरीब बिचारा शेतकरी या भुलथापांना सहज बळी पडतो.

तसेच त्याच वृत्तपत्रातून आतल्या पानावर राज्यभर उसळलेल्या शेतकरी संघटनेच्या आंदोलनाच्या, नेत्यांच्या सभांच्या, मोर्च्यांच्या भरमसाठ बातम्या कॉलमच्या कॉलम भरून येत होत्या. संघटनेच्या नेत्यांनी भानुसिंगने चार जिल्ह्यात थैमान घातलेले. पंचक्रोशीत रान पेटवलेले. ऊसाचं एक कांडही कारखान्याला घालवायच नाही म्हणून सगळीकडे दंगा चाललेला. ऊसाला योग्य भाव मिळाला तरच ऊस कारखान्याला पाठवायचा. आपली बाजू सत्याची असल्याने

साखरसम्राट शेतकरी संघटनेपुढे गुडघे टेकणारच अशी खात्री सर्वांना झाली होती. म्हणून मोहन पाटील सांगतात की, ''शेतकऱ्यांनो, ऊस पिकीवताना किती कष्ट पडतात हे टाटा सुमोतनं, गाड्यांतनं फिरणाऱ्यांना कळणार नाही. त्यांच्या खुर्चीखालची जमीन हादरली तरच त्यांचे डोळे उघडतील. या आंदोलनानं आपण साऱ्यानी मिळून एकजुटीनं असा हादरा देऊ या की शेतकऱ्यांच्या नावानं इतिहास लिहला जाईल.''[८०]

कारखान्याची तोड सोमवारी जाहीर केली होती. कारखाना रात्रीचाच ऊस तोडून शेतकऱ्यांच्या डोळ्यात धूळ फेकील म्हणून भानुसिंगने ठराविक लोकांचे गट करून रात्रभर पहारा करायला सांगितला होता. त्याप्रमाणे सर्वांनी ठिकाणं वाटून घेतली. जो तो डोळ्यात तेल घालून पहारा करू लागला. ऊस कारखान्याला नेण्याच्या वाटेवर तर कडक बंदोबस्त होता. प्रत्येक शेतकरी हळूहळू मरण्यापेक्षा एकदम मरू या या भावनांनी प्रेरीत झाला होता. प्रत्येक शेतकरी एक जबाबदार शेतकरी म्हणून आपली भूमिका बजावत होता. कोणताही अल्लडपणा त्यात नव्हता. सर्व कारभार शिस्तीत एकोप्याने कोणताही दूराग्रह न ठेवता. कसलाही तंटा निर्माण न होता चालला होता. शेतकऱ्यांचा हा सर्व अट्टाहास फक्त ऊसाला दर मिळावा म्हणून होता. कारखाना बंद पाडण्याची कसलीही भूमिका त्यापाठीमागे नव्हती. लोकशाही मार्गानेच आंदोलन सुरू होते.

बोरीगावात आठवड्याचा बाजार भरला होता. बाजारात भारत कृषी सेवा केंद्र असा बोर्ड असलेल्या दुकानाच्या गॅलरीत तुका मेंबर उभे होते. त्यांनी बाजारात शामाला बघताच त्याला हाक मारली. शामा घाबरला कारण तुका मेंबर कारखान्याच्या बाजूने होते. अशाप्रसंगी शामाला कोणी बघितले तर शामाची बदनामी होईल. शामा गद्दार अविश्वासू आहे असे लोक म्हणतील. तरीही शामा मेंबरच्याकडे गेलाच. शामा व मेंबरच्यामध्ये सुरूवातीला ऊस कारखान्याला पाठवावा का न पाठवावा याविषयी मतभेद झाले. मेंबरच्या मते जयसिंगअण्णा हे प्रामाणिक चांगले, सर्व सामान्यांचा कनवळा असलेले गृहस्थ आहेत. म्हणून त्यांनी संघटनेच्या कारभारात जास्त लक्ष देवू नये. म्हणजे येत्या कारखान्याच्या इलेक्शनला संचालक पदासाठी नाव घेता येईल. तुका मेंबरच्या बोलण्यातून मूठभर लोकांच्यामुळे राजकारण घाण पाण्याचं डबके बनले आहे. चांगली माणसे राजकारणात उतरण्यास सज्ज आहेत. परंतु ही मूठभर माणसे त्यांचा टिकाव लागू देत नाहीत.

वर्तमानपत्रात तर राज्यभरातील ऊस आंदोलना विषयीच्या बातम्या प्रसिद्ध होत होत्या. कायदा आणि सुरक्षतेचा प्रश्न गंभीर बनल्यावर जिल्ह्यात पोलिस बंदोबस्त वाढविण्यात आला होता. सगळीकडे गंभीर वातावरण निर्माण झाले होते.

भानुसिंग बोरीगावच्या ऑफिसमध्ये होता तेव्हा शामाने पळत पळत येवून भानुसिंगला संभा खंदारे कारखान्याला ऊस घेवून निघाल्याची बातमी सांगितली. तसे भानुसिंग व इतर सर्व कार्यकर्ते जोषाने निघाले. लाटेवाडी रस्त्यावरून येणाऱ्या ऊसाने भरलेल्या गाड्या पाहून कार्यकर्ते उग्र संतापाने रसरसत होते. तिथे संभा खंदारे आणि भानुसिंग यांच्यात हाणामारी झाली. त्या दंगलीत भानुसिंगच्या डोक्यात खंदारेनी काठी मारली. तसे तो रक्ताने न्हावून निघाला. भानुसिंगच्या अंगावर रक्त पहाताच खंदारेच्या कार्यकर्त्यांनी पाय काढून घेतले. भानुसिंगच्या कार्यकर्त्यांनी भानुसिंगला दवाखान्यात नेले. ही घटना संघटनेतील कार्यकर्त्यांना कळाली तसे ते पेटून उठतील. आपला कुठेच ठावठिकाणा राहणार नाही ह्या भीतीने खंदारेचे लोक पळून गेले.

चिंचली गावावरही काळरात्र उजाडली. लोकांनवर खूप अत्याचार झाला. या सर्व गोष्टीचे पडसाद वर्तमानपत्रातील पानापानावर ऊस आंदोलनास मिळालेल्या हिंसक वळणाचे वणवे पेटलेले दिसू लागले. चिंचली गावावर झालेला अत्याचाराने कार्यकर्त्यांची डोकी भडकली. पोलीस कारवाईचा सर्वत्र निषेध होऊ लागला. दंडुकेशाहीच्या दडपणाविरूद्ध असंतोष भडकून तो आकाशाला थडकला. सर्वत्र पसरला. लोकभावनेच्या संतापाच्या ज्वाला मुंबई दिल्लीपर्यंत पोहचल्या त्या अग्निज्वालांची झळ मंत्रालयाला जाणवू लागली. सरकार बरखास्त होण्याच्या गगनभेदी आरोळ्या उठल्या. संसद भवन डळमळू लागले. खुर्च्या हलू लागल्या. उच्चासनांचा थरकाप उडाला. यंत्रणेची चाकं जलद गतीने फिरू लागली. ह्या गोष्टीची प्रतिक्रिया म्हणजे दिल्लीमधून ऊस उत्पादकांसाठी केंद्राकडून भरघोस मदत जाहीर झाली. या घटनेचा परिणाम कसा झाला याचे वर्णन अतिशय सुंदर शद्वात मोहन पाटील करतात. ते म्हणतात, ''ही वार्ता म्हणजे समुद्रभर पेटलेल्या वडवानलावर मारलेला पाण्याचा सपकारा होता पण त्या शिंतोड्याने चमत्कार केला.''[८१]

आंदोलनाच्या गगनाला भिडलेल्या ज्वाला खाली उतरू लागल्या. शेतकऱ्यांची भडकलेली मस्तकं शांतवू लागली. वातावरणातील धग ओसरू लागली. तापलेले रस्ते, इमारती, घरे, शिवारं

थंडावू लागली. साखर कारखान्याच्या धुराड्यामधून सुटकेचे श्वास बाहेर पडले. एका वेगळ्याच प्रकारची शांतता ऊस आंदोलकांच्या बरोबर प्रत्येक गावागावातून पसरली. बऱ्याच महिन्यांनी पाऊस पडल्यावर जसा मातीचा सुंदर सुगंध सर्वत्र दरवळतो. तशी ऊस आंदोलकांना मिळालेल्या विजयाची चर्चा सर्वत्र दरवळू लागली.

कारखान्याच्या मान्यवरांना मात्र या गोष्टीचा काडीमात्र आनंद झाला नव्हता. कारण संभा खंदाऱ्यांनी केलेल्या छोट्याशा चुकीने एका नवीन नेत्याला सामोरे जावे लागणार होते. खंदारेनी एक काठी मारली आणि एका नेत्याला जन्माला घातल डोक फोडलं पण काठी खाऊन तो उठलायं लोक त्याला डोक्यावर घेणार कारण तो त्यांच्यातीलच एक आहे. तसेच संघटनेला विजय त्याच्यामुळच मिळाला आहे. त्यामुळे लोकांना भानुसिंग अधिक जवळचा वाटतो. पुढारी लोकांना आपल्यापुढे एखाद्या गरिबाने जावे असे कधीच वाटत नाही, उलट ते त्या गरिबाचा जागोजागी पाय ओढत रहातात. त्याला शांत बसण्यास भाग पाडतात. कारण त्याचा त्यांच्या सत्तेवरती परिणाम होतो.

आंदोलनाच वारं जरा थंड होतंय ना होतंय तोच किशाचा सासरा वारल्याचा निरोप आला. मरणाच्या वाटेने एक ना एक दिवस प्रत्येकाला जावेच लागते. प्रत्येकाने एकमेकाला शेवट पर्यंत साथ द्यावी, कोणी आधी मरू नये. सगळ्यांनी बरोबरीने जगावे असे प्रत्येकाला वाटते. परंतु सृष्टीचा नियम आहे तसेच घडणार तसेच लोकांना वागावे लागते. मढ्याजवळ आहे तो पर्यंत मरणाच्या गोष्टी त्याची भीती ही एवढी वेळ संपली की जो तो पोटाच्या मागे लागतोय. देवानं पोट दिलं नसतं तर माणसाला मरणाचा विसर पडला नसता. पोट भरायच्या नादात माणूस मरणाच्या गोष्टी विसरतो. कसं अजब केलयं देवाने. फडतरे म्हाताऱ्याचा कार्यक्रम आटोपून किशा घरी परतला घरी गेल्यावर नंतर गावंदरीला लावण कशी काय उगवली आहे हे पहायला गेला. लावण चांगली उगवली होती. त्यामुळे त्याला खुप आनंद झाला. समाधान वाटले. तेवढ्यात खंडेरावच्या खोडव्यात पाणी पाजत असलेल्या डफेदाराच्या पोराने किशाला हाक मारली. त्याने किशाला ऊसावर लोकारी मावा आल्याचे दाखवले. त्यामुळे किशा जरा बावरला लगेच तो त्याच्या वावरात गेला त्याच्या लावणीवर रोग आला नव्हता. ऊसाच्या दराचा प्रश्न सुटला होता. आणि आता लोकरी माव्याने गाठलं होतं म्हणजे 'दाल्ल्यानं सोडलं नि सोयऱ्यानं गाठलं'. अशी अवस्था झाली आहे. एक झालं की एक दुखणं शेतकऱ्याच्या

पाचवीलाच पुजलेलं असतं लावणं बघून किशा घरी गेला. जेवण केले, जेवण झाल्यावर सोप्यात वाकळ टाकून कलंडला पण त्याला काही झोप येईना. थोडया वेळाने आत उतरून तो अंधारात खोल खोल बुडू लागला. खोल खोल अंधारात विहिरीत बुडून खोल खाली तळ शोधत गेला तो आणखी बुडाला नि त्याला तिथं पुन्हा उंदीर दिसले. ते पांढरे उंदीर त्याला त्रास देऊ लागले. त्यांच्या त्रासाला कंटाळून किशाने त्यांच्यावर विळा उगारला. तो विळा बघून पांढरे उंदीर दबकले त्यांना किशानं उगारलेल्या विळ्याची धार सहन होईना. शेवटी त्यांनी बिळ शोधले आणि वाटेला लागले.

शेतकऱ्याच्या आयुष्यात एक झाली की एक समस्या धावून येत असते. उलट भांडवलदार लोकांच्या आयुष्यात एका मागून एक सुख पायात लोटांगण घालत असतात. इथे मात्र आमचे शेतकरी एका सुखाच्या क्षणासाठी आसुसलेले असतात. चातक पक्षाला जसा एक पावसाचा थेंब सुखावून जातो त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना सुखाचे महत्त्व असते.

'साखरफेरा' मध्ये मोहन पाटील यांनी ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या, साखरप्रश्नाचा गुंता, त्यामध्ये घडणारे सहकारमार्गी राजकारण, सहकारी संस्थामधील भ्रष्टाचार, ऊसाला दर मिळावा म्हणून केलेले आंदोलन असे अनेक मुद्दे सविस्तरपणे शद्बबद्ध करण्यात आले आहेत.

******

# संदर्भ


१) मोहन पाटील– साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३९

२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३२

३) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ९६

४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५३

५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५८

६) तानाजी राऊ पाटील – मराठी कादंबरी : समीक्षा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र. आ., पृ. १७१

७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३७

८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ८६

९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १६१

१०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १८९

११) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. २३३

१२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ४५

१३) तानाजी राऊ पाटील – मराठी कादंबरी : समीक्षा, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्र. आ., पृ. १७३

१४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १०

१५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १६

१६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ११८

१७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १७९

१८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १३५

१९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ८

२०) तत्रैव साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५८

२१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १७९

२२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १८२

२३) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १७४

२४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ९०

२५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १०९

२६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. २२०

२७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३०

२८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५६

२९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १००

३०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ७०

३१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ९

३२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५९

३३) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ११९

३४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३५

३५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३६

३६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ४९

३७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५०

३८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. २०

३९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १२०

४०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १६९

४१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १८१

४२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १६६

४३) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १६२

४४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १८४



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

४५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

४६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ६१

४७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ६८

४८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ८६

४९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ७

५०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

५१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १४२

५२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १७७

५३) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

५४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. २१०

५५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३

५६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. २८

५७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५२

५८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

५९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ८३

६०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १२

६१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १४६

६२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १४६

६३) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५८

६४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १४

६५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ४३

६६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १८१

६७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १८५

६८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ४

६९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ५

७०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

७१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

७२) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ८

७३) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

७४) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ३९

७५) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ४१

७६) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. ४७

७७) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ.

७८) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १०५

७९) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १३६

८०) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. १७६

८१) तत्रैव – साखरफेरा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. २२०


******